सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## इथिओपियाच्या संसदेत मोदी म्हणाले; ही सिंहांची भूमी

### पंतप्रधानांना देशाचा सर्वोच्च सन्मान देण्यात आला, तो मिळवणारे पहिले ग्लोबल लीडर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७इथिओपिया**

पंतप्रधान मोदींनी बुधवारी इथिओपियाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित केले. ही जगातील १८ वी संसद आहे, जिथे पंतप्रधान मोदींनी भाषण दिले. मोदी म्हणाले की, मला इथिओपियामध्ये येऊन खूप आनंद होत आहे. ही सिंहांची भूमी आहे. येथे मला माझ्या घरासारखे वाटत आहे, कारण माझे गृहराज्य गुजरात देखील सिंहांची भूमी आहे.

यापूर्वी इथिओपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली यांनी मंगळवारी मोदींना देशाचा सर्वोच्च सन्मान प्रदान केला होता. ते 'द ग्रेट ऑनर निशाण ऑफ इथिओपिया' हा सन्मान मिळवणारे पहिले जागतिक नेते ठरले. या प्रसंगी पंतप्रधानांनी सांगितले की, हा सन्मान माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

मोदी मंगळवारीच इथिओपियामध्ये पोहोचले होते. हा त्यांचा पहिला दौरा आहे. पंतप्रधान अबी अहमद अली यांनी नॅशनल पॅलेसमध्ये त्यांचे औपचारिक स्वागत केले. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठकही घेतली.मोदी म्हणाले, कोविड-१९ दरम्यान भारताने १५० हून अधिक देशांमध्ये औषधे आणि लसी पाठवल्या. इथिओपियाला ४० लाखांहून अधिक लसीचे डोस पुरवणे ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट होती.

मोदी म्हणाले, भारतात, आम्ही स्वतःची सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण केली आहे. यामुळे सरकारी सेवा जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. आज, भारतातील जवळजवळ प्रत्येकजण पेमेंट, ओळख आणि सरकारी सेवांसाठी डिजिटल पद्धती वापरतो. जगातील अर्ध्याहून अधिक डिजिटल पेमेंट भारतात केले जातात.

मोदी म्हणाले, इथिओपियातील सर्वात मोठ्या गुंतवणूकदारांमध्ये भारतीय कंपन्या आहेत. त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये ५ अब्ज (४५,००० कोटी रुपये) पेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे आणि ७५,००० हून अधिक नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. आम्ही भारत-इथिओपिया द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे.

इथिओपियाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनात मोदींनी भाषण संपवताच खासदारांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या.

## मोदींची कबर खोदण्याची स्वप्न पाहणाऱ्या काँग्रेसची कबर जनता खोदेल

### काँग्रेसची टीका देश प्रेमातून नाही पाकिस्तान प्रेमातून; पृथ्वीराज चव्हाणांच्या दाव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा जोरदार प्रहार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

देशावर दहशतवादी हल्ले होत असताना, भारतीय लष्कर दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करत असताना आणि संपूर्ण देश एकजुटीने उभा असताना काँग्रेसचे नेते मात्र पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कबर खोदण्याची भाषा करणाऱ्यांची कबर देशाची जनता खोदेल, असा थेट, प्रहार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसवर केला.राहुल गांधी, पृथ्वीराज चव्हाण आणि पी. चिदंबरम यांच्या भूमिकेवर टीका करताना शिंदे म्हणाले की, लष्कराच्या कारवाईवर प्रश्न विचारणे म्हणजे थेट जवानांचे मनोबल खच्चीकरण करणे आहे असे शिंदे म्हणाले.पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने राबवलेल्या ऑपरेशन 'सिंदूर' अंतर्गत दहशतवाद्यांचे तळ अचूकपणे उद्ध्वस्त करण्यात आले. ही कारवाई अत्यंत प्रिसाईज असून कोणतेही नागरी नुकसान झाले नाही. या कारवाईमुळे भारताची लष्करी ताकद आणि राजकीय इच्छाशक्ती जगासमोर पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे, असे शिंदे म्हणाले.या संपूर्ण मोहिमेत लष्करी जवानांच्या पाठीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी खंबीरपणे उभे राहिले. खून आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, हा संदेश मोदी सरकारने पाकिस्तानला आणि संपूर्ण जगाला दिला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.मात्र, या शौर्यपूर्ण कारवाईनंतर काँग्रेसच्या नेत्यांकडून करण्यात आलेली वक्तव्ये देशविघातक असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. ही टीका देशप्रेमातून नाही, तर पाकिस्तानप्रेमातून होत आहे. काँग्रेस नेत्यांची विधाने पाकिस्तानमध्ये हेडलाईन बनत आहेत, हे अत्यंत लाजिरवाणे आहे, असे ते म्हणाले.२६/११ च्या वेळी काँग्रेस सरकारने जर सडेतोड उत्तर दिले असते, तर आज देशाला पुन्हा पुन्हा अशी किंमत मोजावी लागली नसती, असा टोला त्यांनी लगावला.अब गोली का जवाब गोली से, असे सांगत शिंदे यांनी स्पष्ट केले की, पाकिस्तानविरोधातील ही कारवाई संपूर्ण देशाच्या आत्मसन्मानाशी जोडलेली आहे. देश, लष्कर आणि पंतप्रधानांविरोधात गरळ ओकणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.शेवटी, पहलगाममध्ये निष्पाप नागरिकांच्या हत्येचे जशास तसे उत्तर भारतीय लष्कराने दिल्याचे सांगत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लष्कराला सलामी दिली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे अभिनंदन केले.

## कुठल्याही क्षणी अटकेची शक्यता असताना माणिकराव कोकाटे पडले आजारी

### लीलावती रुग्णालयात दाखल : अटक वॉरंट ला हायकोर्टात चॅलेंज करणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

मंत्री माणिकराव कोकाटे यांना जिल्हा न्यायालयाने २ वर्षाचा कारावास शिक्षा सुनावल्यानंतर आता त्यांच्यावर अटकेची कारवाई होणार आहे. माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. हायकोर्टात शिक्षेला स्थगिती मिळेपर्यंत कोकाटे यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. कमी दरात सदनिका खरेदी केल्याचा गुन्हा सिद्ध झाल्यानंतर कोर्टाने त्यांना दोषी ठरवले होते. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कोकाटे यांची आमदारकीही रद्द होण्याची शक्यता आहे. त्यातच माणिकराव कोकाटे लीलावती रुग्णालयात उपचार घेत असल्याचे समोर आले आहे.

जिल्हा न्यायालयाने कोकाटे प्रकरणी स्पष्ट आदेश पारित केल्यानंतर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी कोर्टात धाव घेत कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करा अशी मागणी केली होती. याबाबत याचिकाकर्त्यांचे वकील आशुतोष राठोड यांनी सांगितले की, माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटकेचे आदेश पारीत झाले आहेत. त्यांनी तातडीने पोलिसांसमोर शरण जावे अथवा पोलिसांनी त्यांना अटक करावी असा आदेश कोर्टाने दिला आहे अशी माहिती त्यांनी माध्यमांना दिली. त्याशिवाय लोकप्रतिनिधी कायद्यानुसार २ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षा झाली असेल तर आमदारकी रद्द होते. कोकाटे यांनी नैतिकतेच्या आधारे मंत्रिपदाचा राजीनामा देणे क्रमप्राप्त आहे. मुख्यमंत्र्यांकडे विधी व न्याय विभाग आहे. आतातरी किमान माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेऊन हे कायद्याचे राज्य आहे याची प्रचिती द्यावी अशी मागणीही वकिलांनी केली.

तर सत्र न्यायालयाच्या निर्णयाला कोकाटे यांच्या वकिलांकडून हायकोर्टात आव्हान देण्यात येणार आहे. शिक्षा स्थगित व्हावी असा त्यांचा प्रयत्न आहे. तत्पूर्वी माणिकराव कोकाटे आजारी असल्याने त्यांना उपचारासाठी लीलावती रुग्णालयात दाखल केल्याचे सांगण्यात येत आहे. कोकाटे यांना शरण येण्यासाठी ४ दिवसांचा वेळ मिळावा असा अर्ज कोर्टात करण्यात आला. मात्र तो अर्ज कोर्टाने नामंजूर केला. पण कायद्यानुसार पुढच्या कोर्टात आव्हान देण्याचा पर्याय आमच्याकडे आहे. अटक वॉरंट जारी झालंय त्याला हायकोर्टात चॅलेंज करू असं माणिकराव कोकाटे यांचे वकील मनोज पिंगळे यांनी माहिती दिली.

## कोकाटेंच्या शिक्षेमुळे सुनील केदार बच्चू कडू प्रकरणांची आठवण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

काँग्रेसचे माजी मंत्री सुनील केदार यांना शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी दुसऱ्याच दिवशी केदार यांची आमदारची रद्द केली होती. आता हीच तत्परता नार्वेकर कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात दाखवतील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.


नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणी सुनील केदार यांना ५ वर्षांची शिक्षा झाली होती. न्यायालयाचा निकाल आल्यानंतर लगेचच राज्य सरकारच्या वतीने राजपत्र काढण्यात आले आणि सुनील केदार यांची आमदारची रद्द करण्यात आली. आता महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना जिल्हा व सत्र न्यायालयाने मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या १० टक्के कोट्यातून लाटलेल्या चार सदनिका घोटाळा प्रकरणी दोषी धरले आणि अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी फेब्रुवारीत दिलेला निकाल कायम ठेवला. त्या न्यायालयाने दोन वर्ष सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालानुसार दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी कोणत्याही न्यायालयाने शिक्षा दिल्यास संबंधित लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व रद्द केले जाते. त्या कायद्याच्या आधारे नागपूर जिल्ह्यातील सावनेरचे माजी आमदार केदार यांची आमदारकी रद्द करण्यात आली. आता कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा न्यायालयाकडून सुनावण्यात आली आहे. या शिक्षेमुळे माणिकराव कोकाटेंच्या आमदारकीवर टांगती तलवार आली आहे.

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नियमा प्रमाणे संचालकाला न्यायालयाने एक वर्षापर्यंत शिक्षा सुनावली असेल तर अशा संचालकांना बँकेच्या पदावर राहता येत नाही. याच नियमाचा दाखला देत विभागीय सहनिबंधकांनी त्यांचे संचालक पद रद्द ठरवले होते. बच्चू कडू यांच्यावर २०१७ मध्ये नाशिक मधील सुकरवाडा पोलीस स्टेशन येथे शासकीय कामात अडथळा व मारहाण करण्यात संदर्भातील गुन्हे दाखल आहेत. याच प्रकरणात त्यांना नाशिकच्या विशेष न्यायालयाने एक वर्षापर्यंतच्या कठोर कारावासाची शिक्षा २०२१ मध्ये सुनावली आहे.

## अजित पवारांचे महायुतीतून बाहेर पडण्याचे स्पष्ट संकेत

### राज्यातील राजकारणाचं केंद्रबिंदू ठरल्या महानगरपालिका निवडणुका




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीसोबत जाणार की स्वतंत्र लढणार, याबाबत आजच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे संकेत खुद्द अजित पवार यांनी दिले आहेत. मुंबईतील पक्षाचे पदाधिकारी, प्रमुख नेते आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून राष्ट्रवादीची पुढील दिशा ठरवली जाईल, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं. मुंबईत भाजपकडून नवाब मलिक यांच्याबाबत उघडपणे नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. मंत्री आशिष शेलार आणि भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी नवाब मलिक भाजपसोबत नको, अशी ठाम भूमिका घेतल्यामुळे राष्ट्रवादीमध्येही अस्वस्थता आहे. त्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस मुंबईत स्वबळावर तयारी करत असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. जर मुंबईत महायुतीत सामील न होण्याचा निर्णय झाला, तर त्याचे राजकीय पडसाद संपूर्ण राज्यात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नगरपालिका निवडणुकांनंतर आता राज्यातील राजकारणाचं केंद्रबिंदू महानगरपालिका निवडणुका ठरत असून, त्यातूनच सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीमध्ये अस्वस्थता वाढताना दिसत आहे. विशेषतः मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये जागावाटप, नेतृत्व आणि स्थानिक समीकरणांवरून मतभेद उफाळून येत आहेत. महायुतीत भाजप आणि शिवसेना शिंदे गट एकत्र लढणार असल्याचं जवळपास स्पष्ट असलं, तरी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका मात्र साशंकता निर्माण करणारी ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट पुण्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीविरोधात लढण्याची घोषणा केल्यानंतर महायुतीतील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर आले आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत नेमकी कोणती रणनीती असणार, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

दुसरीकडे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांबाबत अजित पवारांनी वेगळीच भूमिका घेतली आहे. या दोन्ही ठिकाणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत एकत्र येण्याची तयारी असल्याचं त्यांनी सूचक विधान केलं आहे. स्थानिक पातळीवर मतांचे विभाजन टाळण्यासाठी आणि भाजपविरोधात प्रभावी लढत उभारण्यासाठी हा पर्याय विचाराधीन असल्याचं मानलं जात आहे. मात्र, त्याच वेळी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची भूमिकाही अजित पवार गटाने घेतली आहे. त्यामुळे एकीकडे शरद पवार गटाशी संवादाची शक्यता, तर दुसरीकडे स्वबळाचा निर्धार, अशा दुहेरी रणनीतीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा पुढील राजकीय डाव अधिक गुंतागुंतीचा बनत चालला आहे. यामुळे महायुतीतून राष्ट्रवादी बाहेर पडणार का, हा प्रश्न आता अधिक ठळकपणे उपस्थित झाला आहे.

## पाकिस्तानने युद्धात भारताचा पराभव केला : पृथ्वीराज चव्हाण आपल्या विधानावर ठाम; म्हणाले - माफी का मागावी? माफीचा प्रश्नच येत नाही



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भारत-पाक युद्धात भारताचा पराभव झाल्याचा दावा केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. पत्रकारांनी याविषयी चव्हाण यांना छेडले असता त्यांनी आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचे सांगत माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे म्हटले आहे. मी माफी मागणार नाही. मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. लोकसभेत सादर केलेल्या शांती विधेयक या अणु खासगीकरणाच्या विधेयकावरून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी माझ्यावर टीका केली जात आहे, असे ते म्हणालेत.

पृथ्वीराज चव्हाण यांनी काल पुण्यातील पत्रकारांशी संवाद साधला होता. त्यात त्यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकने भारताचा पराभव केल्याचा धक्कादायक दावा केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवले होते. पण या मोहिमेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे ७ मे रोजी अर्ध्या तासातच आपली काही विमाने पाडण्यात आली, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानामुळे राज्यासह देशात एकच खळबळ माजली होती. त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया येत होत्या. विशेषतः भाजप नेत्यांनी त्यांच्या माफीची मागणी करण्यात आली आहे.

**मी का माफी मागावी? पृथ्वीराज चव्हाण**

पत्रकारांनी याविषयी बुधवारी पुन्हा त्यांना छेडले असता त्यांनी आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचे स्पष्ट केले. तसेच या प्रकरणी माफी मागण्याचा प्रश्नच येत नसल्याचेही ठणकावून सांगितले. ते म्हणाले, मी माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. मी का माफी मागावी? सोमवारी लोकसभेत शांती विधेयक हे अणु खासगीकरणाचे विधेयक सादर करण्यात आले. या विधेयकावरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी माझ्या विधानावर टीका केली जात आहे. मी माफी मागणार नाही, असे ते म्हणाले.

## मोदी सरकार नववर्षाला गोड भेट देणार!

### १ जानेवारीपासून सीएनजी आणि पीएनजी स्वस्त होणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

नवीन वर्ष २०२६ च्या सुरुवातीलाच सर्वसामान्यांना महागाईतून मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्र सरकारने सीएनजी आणि घरगुती पीएनजीच्या दरात कपात करण्याची तयारी पूर्ण केली आहे. पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डाने गॅस वाहतुकीच्या शुल्कात मोठी कपात जाहीर केली असून, याचे नवे दर १ जानेवारी २०२६ पासून लागू होणार आहेत.

PNGRB ने घेतलेल्या निर्णयानुसार, गॅस वाहतुकीसाठी आता 'युनिफाइड टॅरिफ' प्रणाली लागू केली जाईल. यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होऊन थेट ग्राहकांना फायदा मिळणार आहे. यामुळे सीएनजी प्रति किलो १.२५ ते २.५० रुपयांपर्यंत स्वस्त होण्याची शक्यता आहे. तर पीएनजी घरगुती वापराच्या पाईप गॅसच्या दरात प्रति युनिट ०.९० ते १.८० रुपयांची कपात होऊ शकते.

एक देश, एक ग्रिड, एक टॅरिफ' सरकारने नैसर्गिक वायू वाहतुकीसाठी तीन झोनऐवजी आता केवळ दोन झोनमध्ये विभाजन केले आहे. यापूर्वी ३०० किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर गॅस पाठवण्यासाठी जास्त शुल्क द्यावे लागत होते. मात्र, नव्या नियमानुसार ३०० किमी पेक्षा जास्त अंतरासाठीचे शुल्क ५० टक्क्यांनी कमी होईल. या निर्णयाचा फायदा देशभरातील ३१२ भौगोलिक क्षेत्रांमधील ४० शहरांतील गॅस वितरण कंपन्यांना होईल.

**कोणाला होणार फायदा?**

या निर्णयामुळे मुंबईतील 'महानगर गॅस', दिल्लीतील 'इंद्रप्रस्थ गॅस' आणि अदानी टोटल गॅस यांसारख्या कंपन्यांना होणारा गॅस पुरवठा स्वस्त होईल. याचा थेट लाभ रिक्षा-टॅक्सी चालक, खाजगी वाहन चालक आणि स्वयंपाकघरात पाईप गॅस वापरणाऱ्या गृहिणींना मिळेल.

## संपादकीय ......

# काँग्रेसमधील बुद्धिवाद्यांचा बुद्धीभ्रम की एकाकीपणा!

*बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणूक प्रचारामध्ये काँग्रेसचे राहुल गांधी आणि राजदचे तेजस्वी यादव यांच्या सभांना मोठा प्रतिसाद मिळत होता, त्यामुळे यावेळी तरुण तुर्क नितीश कुमार यांची वर्षानुवर्षांची मुख्यमंत्रीपदाची गादी हलवणार असे वाटत होते, पण सबसे बडा रुपय्या, हा न्याय भारी पडला आणि निवडणुकीपूर्वी महिलांच्या बँक खात्यावर जमा झालेल्या १० हजार रुपयांनी जादू केली. नितीश कुमार आणि भाजप यांच्या युतीची सत्ता पुन्हा आली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला अकल्पित असे यश मिळाले होते, त्यामुळे त्यापाठोपाठ होणार्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री हा काँग्रेसचा होईल, असे विधान काँग्रेसचे बुजुर्ग, बुद्धिजीवी नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले होते. त्यांच्या या विधानाने त्यांच्यासोबत महाविकास आघाडीत असलेल्या उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना धक्का बसला होता. उद्धव ठाकरे यांना जास्त धक्का बसला होता, कारण महाविकास आघाडीची पुन्हा सत्ता आल्यानंतर आपण मुख्यमंत्री व्हायला हवे, असे त्यांना मनापासून वाटत होते, त्यांच्यासाठी त्यांचे प्रवक्ते संजय राऊत योजनाबद्ध फिल्डिंग लावून तसा प्रचार करत होते. पण काहीही झाले तरी काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे सारखा सारखा कुणाच्या पालखीचा भोई होणार नाही. उलट, त्यांनीच याअगोदर प्रादेशिक पक्षांना आपल्या पालखीचे भोई केलेले होते.*

*लोकसभा निवडणुकीतील यशामुळे काँग्रेसच्या पंखात नवे बळ संचारले होते, त्यामुळे एकेकाळी सोनिया गांधी यांनी आपल्या खास मर्जीतले म्हणून राज्यात पाठवून थेट मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिलेले पृथ्वीराज चव्हाण सर्वात अगोदर बोलते झाले. कारण त्यांचा अधिकार मोठा. पृथ्वीराज चव्हाण यांनी अगोदरच काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असे जाहीर केले होते, पण महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये दरमहा महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीला अनपेक्षित असे प्रचंड यश मिळाले. त्यामुळे पृथ्वीराज चव्हाण यांनी बांधलेला अंदाज आणि व्यक्त केलेली इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. पृथ्वीराज चव्हाण हे उच्चशिक्षित आणि काँग्रेसच्या चलतीच्या काळात पीएमओमध्ये काम केलेले खास नेते. त्यामुळे त्यांच्या बोलण्याला विशेष महत्त्व दिले जाते. कारण राज्यात देशमुख आणि राणे यांच्या वादातून काँग्रेसला त्यांनीच वाचवले होते. या अशा महनीय पृथ्वीराज चव्हाण यांनी सध्या एकदा नव्हे तर दोनदा खळबळजनक असा छातीठोक दावा केला आहे. येत्या १९ डिसेंबरला देशात सर्वात मोठा राजकीय भूकंप होईल. भारताचा पंतप्रधान बदलेल आणि मराठी माणूस पंतप्रधान होईल. ती व्यक्ती भाजपचीच असू शकते, असे पृथ्वीराज चव्हाण यांचे म्हणणे आहे. अमेरिकेतील एक व्यक्ती जी इस्त्राईलचा गुप्तहेर होता, त्याने अनेक दिग्गज व्यक्तींच्या बंगल्यात कॅमेरे लावून स्टिंग ऑपरेशन केले आहे, आता लवकरच तो अनेकांचा पर्दाफाश करणार आहे. त्यामुळे अमेरिकेत मोठा धुमाकूळ होणार आहे. अमेरिकन सरकार एक कायदा करून येत्या १९ डिसेंबरला त्या दिग्गजांची नावे जाहीर करणार आहे, असा दाव*

*पृथ्वीराज चव्हाण यांनी सगळीकडे खळबळ उडवून दिली असली तरी त्यांच्या पक्षातूनदेखील त्यांना फारसा प्रतिसाद मिळताना दिसत नाही. राज्यातील भाजप नेत्यांनी तर चव्हाण यांचा हा दावा हसण्यावारी नेला आहे. अर्थात, नागपूरमधील मराठी माणूस पंतप्रधान होणार म्हटल्यावर एकनाथ शिंदे यांच्या गोटात आनंदाची लहर उमटली आहे, पण पृथ्वीराज चव्हाण ज्या कारणाने पंतप्रधान बदलेल असे सांगत आहेत, ते कारण काही सहजी पटण्यासारखे नाही. त्याचे सुरुवातीचे टोक अमेरिकेत आहे. म्हणजे सातसमुद्रापार. कायदा मंजूर कोण करणार तर डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार. भारतावर जबर टॅरिफ लावूनही डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुढे मोदी झुकले नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांनी ट्रम्प यांचे कडवे विरोधक रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचा भारतदौरा घडवून आणला आणि महत्त्वपूर्ण द्विपक्षीय करार केले. तरीही ट्रम्प मोदींचे काही बिघडवू शकले नाहीत. काही दिवसांपूर्वी सोनिया गांधी यांच्या खास मर्जीतले आणि काँग्रेसचे राज्यसभेतील माजी खासदार, बुद्धिवादी कुमार केतकर यांनी एका वाहिनीला मुलाखत देताना, अमेरिकेची गुप्तहेर संस्था सीआयए आणि इस्त्रायलची गुप्तहेर संस्था मोसाद यांच्यामुळे काँग्रेसचा २०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाला, असा खळबळजनक दावा केला होता. केतकर यांच्यासारख्या अनुभवी पत्रकाराने असा दावा केल्यानंतर सुरुवातीला सगळ्यांना धक्का बसला, पण काँग्रेसमधील कुठल्याही नेत्याने त्यांच्या या खळबळजनक विधानाची दखल घेऊन त्यांची बाजू घेतली नाही. याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाहीत. इतकेच काय त्यांच्या विधानाची कुणीच दखल घेतली नाही. केतकर यांनीही पुरावा देऊन आपला दावा सिद्ध केला नाही. काँग्रेसमधील ज्या २३ बुजुर्ग नेत्यांनी सोनिया गांधींना पत्र लिहून पक्षात सर्वांगीण सुधारणा करण्याचा सल्ला दिला होता, त्यात पृथ्वीराज चव्हाण होते. अर्थात, त्या पत्रामुळे सोनिया गांधी नाराज झाल्या होत्या. या दाव्यांचे स्वरूप पाहता पृथ्वीराज चव्हाण, कुमार केतकर या काँग्रेसमधील बुद्धिवाद्यांचा बुद्धीभ्रम झाला आहे की, त्यांना वयोमानानुसार एकाकीपणा सतावत आहे, हे कळणे अवघड आहे.*

# नगरसेवकाची मुलाखत

नमस्कार साहेब, लवकरच मतमोजणी होऊन तुम्ही नगरसेवक होण्याची शक्यता आहे. तुमची थोडक्यात मुलाखत घेणार आहे. नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर तुमचा पुढील प्लॅन काय आहे? म्हणजे जसे की, आपल्या वार्डाचा विकास, शहर सुंदर करणे इत्यादी. आपण निश्चितच काही ना काही तरी नियोजन केलेले असेलच. नगरसेवक म्हणून निवडून येण्याच्या आधी तुम्ही माझी मुलाखत घेत आहात. तुमचे कौतुकच केले पाहिजे.

बाकी प्लॅन म्हणाल, तर असा फार काही विशेष नाही. वार्डाचा विकास वगैरे होत असतो. त्याला एकटा नगरसेवक जबाबदार नसतो. निवडून आल्याबरोबर सगळ्यात पहिल्यांदा थार गाडी घेणार आहे. मोठी गाडी असल्याशिवाय 'पुढारी मंडळी'चे इम्प्रेशन पडत नसते. भली मोठी गाडी घेऊन फिरल्याशिवाय लोकांनाही आम्ही नगरसेवक झाल्याचा फील येत नसतो. ज्या दिवशी निवडून आलो, त्या दिवशी साधारणतः दहा-बारा पोते गुलाल वार्डात उधळून सगळा वॉर्ड लालेलाल करून टाकणार आहे आणि त्याच दिवशी थार गाडी बुक करणार आहे.

तुम्ही कोणतीही गाडी घेतली, तरी जनतेची सेवा करण्यासाठीच घेत आहात, याची आम्हाला कल्पना आहे. निवडून आल्यानंतर, गुलाल उधळल्यानंतर, गाडी आल्यानंतर दुसरे कोणते काम तुम्ही करणार आहात? हे पाहा, गेले सहा महिने दगदग करून, विचार करून आणि राजकारण करून जीव शिणला आहे.


गाडी घेऊन सरळ ८-१० दिवस कुठल्यातरी हिल स्टेशनला निवडक कार्यकर्त्यांसह आराम करण्यासाठी जाणार आहे. थोडा आराम केल्याशिवाय आता फ-ेश वाटणार नाही, इतकी दगदग झाली आहे. वार्डातील मतदारांच्या पाया पडून पडून कंबर पार वाकून गेले गेली आहे. त्यामुळे जनतेची सेवा करण्यासाठी सगळ्यात पहिल्यांदा मी १५ दिवस आराम करणार आहे. एकदा का आराम झाला की, फ्रेश होऊन कामाला लागणार आहे.

अच्छा, म्हणजे हा आरामसुद्धा तुम्ही जनतेची सेवा करण्यासाठीच करत आहात. ठीक आहे. त्यानंतरचा तुमचा पुढील कार्यक्रम कसा असणार आहे? नगरसेवक म्हणून कामाला लागल्याबरोबर सगळ्यात पहिल्यांदा या निवडणुकीत झालेला खर्च कसा भरून काढता येईल, याचा विचार करणार आहे. तुम्हाला कल्पना नसेल की, पाच एकर जमीन मी या निवडणुकीसाठी विकलेली आहे. आता येत्या एक वर्षांमध्ये दहा एकर जमीन खरेदी कशी करता येईल, याचे मी नियोजन करणार आहे. बाकी विकासाचे मी पाहून घेईन, तुम्ही काळजी करू नका!

# हॉटेल व बायोमेडिकल वेस्टबाबत मनपाची कडक भूमिका

## नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती**



अमरावती शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये तसेच हॉस्पिटल्समधून निर्माण होणाऱ्या हॉटेल वेस्ट व बायोमेडिकल वेस्टची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावण्याबाबत महानगरपालिकेने कडक भूमिका घेतली आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन नियम व स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट निर्देश माननीय आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिले. या पार्श्वभूमीवर मनपा भवनात हॉटेल वेस्ट मॅनेजमेंट व बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली.

# दारूच्या बाटलीवरचा % ABV आकडा काय सांगतो?

## पिण्यापूर्वी जाणून घ्या हा महत्त्वाचा अर्थ

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य**




डिसेंबर महिना सुरू झाला की थंडी, पार्टी आणि सेलिब्रेशन यांचा माहोल तयार होतो. वर्षाअखेरच्या पार्ट्यांमध्ये अनेकजण मित्रांसोबत ड्रिंक करतात. काही लोक नेहमी दारू पितात, तर काहीजण खास प्रसंगीच. पण दारू घेताना आपण बहुतेक वेळा फक्त ब्रँड, चव किंवा किंमत




पाहतो. मात्र बाटलीवर लहान अक्षरात लिहिलेला एक आकडा असतो, जो फार महत्त्वाचा असतो. तो म्हणजे % ABVबहुतेक लोक या ABV कडे लक्षच देत नाहीत. पण प्रत्यक्षात हाच आकडा सांगतो की तुम्ही पित असलेले पेय किती ताकदवान आहे आणि ते शरीरावर किती लवकर परिणाम करू शकते.

**ABV म्हणजे काय?** ABV म्हणजे अश्रलेहेश्र डू तेर्श्रीश. साध्या शब्दांत सांगायचं झालं तर एखाद्या दारूच्या बाटलीत एकूण द्रवामधील किती टक्के भाग शुद्ध अल्कोहोल आहे, हे ABV दाखवतो. उदाहरणार्थ, एखाद्या बिअरवर ५% ABV लिहिले असेल, तर त्या बिअरमध्ये ५ टक्के अल्कोहोल आणि उरलेले पाणी व इतर घटक असतात.

**वेगवेगळ्या दारूंमध्ये -इत वेगवेगळा असतो** सर्व दारू एकसारखी नसते. बिअरमध्ये साधारण ४ ते ६ टक्के -इत असतो. वाईनमध्ये १० ते १४ टक्के -इत असू शकतो. तर व्हिस्की, रम किंवा व्होडका यामध्ये साधारण ४० टक्के ABVअसतो. म्हणजेच एक ग्लास व्हिस्की आणि एक ग्लास बिअर यांचा परिणाम सारखा नसतो, कारण अल्कोहोलचे प्रमाण खूप वेगळे असते.

**अइत जास्त असेल तर काय फरक पडतो?- अइत** जितका जास्त, तितकी दारू अधिक स्ट्राँग असते. कमी प्रमाणात घेतली तरी नशा लवकर चढू शकते. त्यामुळे -इत माहिती असणे हे स्वतःच्या सुरक्षिततेसाठी खूप महत्त्वाचे आहे. अनेक वेळा लोक नकळत जास्त स्ट्राँग दारू घेतात आणि त्याचे परिणाम शरीरावर लवकर दिसू लागतात.

**कायदेशीरदृष्ट्या -इत का महत्त्वाचा आहे?-** अनेक देशांमध्ये आणि राज्यांमध्ये दारूच्या विक्रीसाठी -इत चे नियम ठरलेले असतात. कोणत्या दारूला किती टक्के अल्कोहोल असू शकतो, यावर नियंत्रण ठेवले जाते. त्यामुळे बाटलीवर -इत लिहिणे बंधनकारक असते, जेणेकरून ग्राहकाला स्पष्ट माहिती मिळेल.

पार्टीमध्ये किंवा दुकानात दारू घेताना फक्त ब्रँड किंवा किंमत पाहू नका. बाटलीवरील % -इत नक्की पाहा. हा आकडा तुम्हाला तुमच्या मर्यादा ओळखायला मदत करतो.

# कोबीवर्गीय पिकांवरील मावा नियंत्रण कसे करावे, काय-काय फवारणी करावी?

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

कोबीवर्गीय पिकांवरील मावा (-phids) ही एक महत्त्वाची रसशोषक कीड असून, ती कोवळी पाने खाऊन पिकाचे नुकसान करते, ज्यामुळे पाने पिवळी पडून सुरकुततात व त्यांच्यावर काळी बुरशी वाढते. या किडीची लक्षणे काय आहेत, उपाय काय करावेत हे समजून घेऊयात....

कोबीवर्गीय पिके- मावा

सध्याचे थंड आणि मधूनच ढगाळ होणारे वातावरण मावा प्रादुर्भावास अनुकूल आहे.

हिरव्या किंवा काळ्या रंगाचे मावा कोवळ्या पानातील




अन्नरसाचे शोषण करतात.

त्यामुळे पाने सुरकुतल्यासारखी होऊन पिवळी पडतात आणि वाळून जातात.

मावा शरीरातून चिकट पदार्थ बाहेर टाकतात.


कोबीवर्गीय पिकांवरील मावा नियंत्रण

हा पदार्थ पानावर साठून राहिल्याने पाने चिकट व तेलकट दिसतात.

त्यानंतर या पदार्थावर काळी बुरशी वाढते. परिणामी, प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते.

झाडांची वाढ खुंटून उत्पादनात घट येते.

व्यवस्थापन बोल्ड मध्ये घेणे

'मावा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीला पोहचल्यास, निंबोळी अर्क ५ टक्के किंवा कडूनिंबावर आधारित कीडनाशक अझाडिरॅक्टीन (३०० पीपीएम) ५ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

या फवारणीमुळे मावा किडीचे प्रमाण कमी होते व मित्र किटकांचे संवर्धन होते.

जैविक कीटकनाशकांमध्ये व्हर्टिसिलीअम लेकॅनी किंवा मेटॅन्हायझीयम निसोप्लीची २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

गरज पडल्यास व जैविक नियंत्रण केले नसल्यास आणि प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या पुढे गेल्यास, रासायनिक कीटकनाशक मॅलॅथिऑन (५० ईसी) २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड (१७.८ एसएल) ०.४ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळन फवारणी करावी.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

# युवा स्वाभिमानच्या २५-३० कार्यकर्त्यांनी मागितली भाजपची उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७ अमरावती** आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षातील २५ ते ३० कार्यकर्त्यांनी महापालिका निवडणुकीसाठी थेट भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मागितल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. भाजपकडून नुकत्याच घेण्यात आलेल्या उमेदवार मुलाखतींमध्ये या कार्यकर्त्यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त करत अर्ज दाखल केल्याची माहिती आहे.आमदार रवी राणा यांच्या पक्षातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते भाजपच्या उमेदवारीसाठी पुढे आल्यामुळे युवा स्वाभिमान पक्षातील अंतर्गत स्थितीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्वतः च्या पक्षातून उमेदवारी मिळण्याबाबत कार्यकर्त्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे का? असा सवाल आता राजकीय विश्लेषकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, केंद्र व राज्यात भाजपची सत्ता असल्याने विकासकामांसाठी सत्ताधारी पक्षाकडून संधी अधिक असल्याचे कारण देत काहीकार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याची माहिती आहे. नुकत्याच पार पडलेल्या प्रवेश कार्यक्रमात युवा स्वाभिमानशी संबंधित काही कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून लगेचच उमेदवारीची मागणी केल्यानेही आश्चर्य व्यक्त केले जात आहे.या घडामोडींमुळे भाजपच्या जुन्या, निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बाहेरून आलेल्या उमेदवारांना तिकीट दिल्यास स्थानिक भाजप कार्यकर्त्यांवर अन्याय होईल का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, एकीकडे आमदार रवी राणा हे महायुतीमध्ये भाजपसोबत जाण्याचे संकेत देत असताना दुसरीकडे त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते थेट भाजपच्या जागांवर दावा ठोकत असल्याने दुहेरी राजकीय भूमिका समोर येत असल्याची चर्चा आहे. ही परिस्थिती युवा स्वाभिमान पक्षासाठी अंतर्गत अस्वस्थता वाढवणारी ठरत असून आगामी निवडणुकीत याचे पडसाद उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.आगामी काळात भाजप नेतृत्व या उमेदवारी दाव्यांबाबत काय निर्णय घेते , याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# उमेदवारीसाठी शिवसेना भवनात इच्छुकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात उमेदवारीसाठी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर राजापेठ येथील शिवसेना भवनात सोमवारी शिवसैनिकांसह इच्छुक उमेदवारांची गर्दी पाहायला मिळाली.

महानगरातील विविध प्रभागातून शिवसैनिक, पदाधिकारी व इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने शिवसेना भवनात दाखल झाले होते. पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांमध्ये चढाओढ सुरू असून पहिल्याच दिवशी संपूर्ण महानगरातून तब्बल १६७ इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज उचलले असल्याची माहिती पक्ष सूत्रांनी दिली. महानगरपालिकेतील प्रत्येक प्रभागात ताकदीचे उमेदवार देण्यावर पक्षाचा भर असून स्थानिक कार्यकत्यांनाप्राधान्य देण्याची भूमिका असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती, पक्ष संघटन, प्रभागातील कार्यक्षमता व जनसंपर्क या निकषांवर उमेदवारांची निवड केली जाणार असल्याचे संकेतही देण्यात आले आहेत.उमेदवारी अर्ज उचलताना शिवसैनिकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. पुढील काही दिवसांत उमेदवार निश्चिती प्रक्रियेला वेग येणार असून पक्षातील राजकीय हालचालींना अधिकच उधाण येण्याची शक्यता आहे.

# श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर ला हेमंतराव काळमेघ यांनी दिली भेट

## पुण्यतिथी उत्सव निमित्त समाधी स्थळाचे घेतले दर्शन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती येथे गाडगेबाबांचा ६९ वा पुण्यतिथी महोत्सव सुरू आहे आज तिसऱ्या दिवशी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे युवा कार्यकारी परिषद सदस्य हेमंतराव काळमेघ यांनी व त्यांच्यासोबत सहकारी यांनी आज गाडगेबाबांच्या समाधीस्थळी भेट दिली उपस्थित सर्वांनी समाधीचे दर्शन घेतले सर्वप्रथम गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन तथा पुष्पहार अर्पण हेमंतराव काळमेघ यांच्या हस्ते करण्यात आले व उपस्थित सर्वांनी दर्शन घेतले

त्याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त सागर देशमुख यांनी सर्वांचे स्वागत केले त्याप्रसंगी चंद्रशेखर रामभाऊ खेडकर संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती अकोला, प्रकाश गवळी माझी जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी जिल्हा परिषद अकोला, ए टी देशमुख अधिष्ठाता डॉक्टर पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज संदीप पुंडकर सेक्रेटरी इंडियन सोशल अँड फाउंडेशन, प्रभजीत सिंह बचेर मानत सचिव इंडियन रेप सोसायटी अकोला, प्राध्यापक डॉक्टर स्वप्निल देशमुख, गाडगेबाबा बालक आश्रम दर्यापूर संचालक गजानन देशमुख, व्यवस्थापक प्रकाश महात्मे आधी उपस्थित होते हेमंतराव काळमेघ यांनी संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांची समक्ष भेट घेतली

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# भयमुक्त वातावरणात होणार निवडणूक

## नवनियुक्त पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी स्वीकारला पदभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शहराचे नवीन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सोमवारी सायंकाळी अमरावती पोलीस आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला. आगामी निवडणूकीला प्राथमिकता देण्यात येणार असून भयमुक्त वातावरणात निवडणूक होणार आहे. पोलिसांचे ब्रीदवाक्य सद्रक्षणाय खलनिग्रहणाय आहे याच प्रमाणे शहरात पोलिसिंग होणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

पोलीस आयुक्त राकेश ओला सोमवारी सायंकाळी पोलीस आयुक्त कार्यालयात पोहोचले. मावळते पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी दोन्ही डीसीपी, एसीपीसह पोलीस अधिकारी उपस्थीत होते. त्यानंतर त्यांनी आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला आणि अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्यानंतर मांध्यमांशी संवाद साधला.

राकेश ओला हे मुळ राजस्थान येथील रहिवाशी असून पोलीस दलात येण्याआधी राजस्थान येथे सहा वर्ष ते न्यायाधीश होते. २०१२ च्या बॅचचे ते आयपीएस



आहेत.आयपीएस झाल्यानंतर त्यांनी प्रथम अहिल्यानगर, मालेगाव, नागपूर शहर व नागपूर ग्रामीण येथे सहायक पोलीस अधिक्षक व पोलीस अधिक्षक म्हणून काम केले आहे. त्यानंतर ते मुंबईला उपायुक्त म्हणून कार्यरत होते. विदर्भात कामाचा त्यांना चांगला अनुभव आहे. तसेच मनपा निवडणूक जाहिर झाल्यामुळे प्रथम प्राथमिकता त्यांनी येणाऱ्या निवडणुकीला दिली आहे. भयमुक्त वातावरणात मनपा निवडणूक होणार असून कोणाचीही हयगय केली जाणार नाही.

पोलिसांच्या ब्रीदवाक्याप्रमाणे काम होणार आहे. शहरातील गुन्हेगारांची माहिती घेतल्यानंतर सराईत गुन्हेगारांवर नियमित कारवाई होणार असून गुन्हेगारांना पोलिसिंग काय असते, याबाबत लवकरच माहिती पडेल. शहरात वाहतूकीचा मोठा प्रश्न असून याबाबत आढावा घेऊन लवकरच काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच शहरातील सर्व अवैध धंद्यांवर अंकुश लावण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सांगितले.

# नकली नोट प्रकरणात आरोपीला शिक्षा

## अमरावती न्यायालयाचा निकाल, दंडही ठोठावला

### सरकारी वकील ॲड. दिलीप तिवारी यांची यशस्वी बाजू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** – नकली नोटा चलनात आणण्याच्या गंभीर प्रकरणात अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे. अभियोजन पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ड. दिलीप डी. तिवारी यांनी प्रभावी युक्तिवाद केला. हे प्रकरण सिटी कोतवाली पोलीस ठाणे, अमरावती अंतर्गत नोंद असलेल्या गुन्हा क्रमांक २२/२०२४ शी संबंधित आहे. अभियोजन पक्षाच्या माहितीनुसार, दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी सिटी कोतवाली हद्दीतील के. एस. जायस्वाल देशी दारू दुकान, वापट चौक, अमरावती येथे आरोपीने नकली नोट चलनात आणण्याचा प्रयत्न केला होता. तक्रारदाराने दिलेल्या नोटची तपासणी केली असता ती नकली असल्याचे निष्पन्न झाले, त्यानंतर तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली.



पोलीस तपासात आरोपीची ओळख अर्शीद खान राशिद खान (वय ४८ वर्षे), रा. मदरसावाला दर्गा, हेलापुरा, अमरावती अशी झाली. सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून २०० रुपयांच्या नकली नोटा जप्त करण्यात आल्या. तपासात नोटांवर इंडिया एक्झामिन बँक असे दिशाभूल करणारे शब्द छापलेले असल्याचे आढळून आले, ज्यामुळे त्या नकली असल्याची पुष्टी झाली.

प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ४८९(ख) व ४८९(क) अंतर्गत दोषी ठरवले. न्यायालयाने कलम ४८९(ख) अंतर्गत ७ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा व २,००० रुपये दंड तसेच कलम ४८९(क) अंतर्गत २० वर्षांपर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा व ४,००० रुपये दंड ठोठावला. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. या प्रकरणात अभियोजन पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ड. दिलीप डी. तिवारी यांनी प्रभावी बाजू मांडली. प्रकरणाचा तपास पीएसआय विजय चव्हाण यांनी केला.

# आमदार प्रताप अडसड यांचा मुंबईत मेट्रोने प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** आमदार प्रताप अडसड हे मतदारसंघाच्या कामानिमित्त मुंबई मंत्रालय गेले असता त्यांनी मुंबईत मेट्रोने प्रवास केला. मुंबईसारख्या प्रचंड गजबजलेल्या महानगरात वेळ, सोय आणि सुरक्षितता यांचा विचार केला तर मेट्रोसारखी आधुनिक वाहतूक व्यवस्था किती महत्त्वाची आहे, याची प्रकर्षाने जाणीव होते, असे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा आवर्जुन उल्लेख केला. मुंबई मेट्रोसारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प केवळ कल्पनेतून प्रत्यक्षात आणणे हे सोपे काम नव्हते. अनेक अडथळे, तांत्रिक अडचणी, प्रशासकीय गुंतागुंत आणि राजकीय टीका यांचा सामना करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासकामांना गती दिली. दूरदृष्टी, ठाम निर्णय क्षमता आणि विकासाबाबतची स्पष्ट भूमिका यामुळेच आज सामान्य मुंबईकर मेट्रो सारख्या सुविधेचा लाभ घेत आहेत. रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळत, पर्यावरणपूरक आणि आधुनिक साधनातून प्रवास करताना जाणवते की योग्य वेळी घेतलेले योग्य निर्णय किती दूरगामी परिणाम घडवू शकतात. हे फक्त एक वाहतूक साधन नाही, तर मुंबईला भविष्याकडे नेणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे, हे सांगण्यात प्रताप अडसड विसरले नाहीत. मतदारसंघासाठी काम करताना अशा प्रकल्पांकडून



निश्चितच प्रेरणा मिळते. लोकांच्या दैनंदिन जीवनात बदल घडवणारे, त्यांचा वेळ वाचवणारे आणि जीवनमान उंचावणारे प्रकल्प म्हणजेच खऱ्या अर्थाने विकास. मेट्रोच्या प्रवासात ही जाणीव अधिक ठळकपणे झाली की दूरदृष्टी असलेले नेतृत्व असेल, तर मोठी स्वप्ने साकार होऊ शकतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिलेला हा विकासाचा मार्गच भविष्यातही आपल्याला पुढेनेईल, याबद्दल मनात नक्कीच अभिमान आणि विश्वास वाटतो, असे यांनी मेट्रो प्रवासाचे वर्णन करताना म्हटले. या प्रवासादरम्यान चेतन कायरकर तसेच आशिष मेरखेडकर हेसुद्धा त्यांच्यासोबत होते.

# घरफोडी व मंदिर चोरी करणारे रेकॉर्डवरील दोन गुन्हेगार गजाआड

## तीन गुन्हे उघडकीस, ४७,७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावती शहरातील वाढत्या घरफोडी व मंदिर चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी अमरावती शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत रेकॉर्डवरील दोन सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले असून, त्यांच्या अटकेमुळे शहरातील एकूण तीन गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून चोरीचा एकूण ४७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती शहरातील घरफोडी व मंदिर चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्पष्ट आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करून गुप्त बातमीदारांच्या माध्यमातून तपास सुरू करण्यात आला. पोलीस ठाणे बडनेरा येथे दाखल अप.क. ६५३/२०२५, कलम ३०५ (ड) भा.न्या.सं. या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की,




सदर गुन्ह्यातील आरोपी हे पुन्हा चोरीच्या उद्देशाने बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात फिरत आहेत.मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून १) प्रधानसिंग बख्तावरसिंग शिकलीकर (वय ४५) व २) जकपालसिंग जगदिशसिंग शिकलीकर (वय २०), दोन्ही रा. एकता नगर, नंदुरबार, नलवा रोड, नंदुरबार या दोन आरोपींना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांनी अमरावती शहरात घरफोडी व मंदिर चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.तपासात आरोपींकडून पोलीस ठाणे बडनेरा येथील दोन व पोलीस ठाणे राजापेठ येथील एक असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून चोरीचे रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण ४७,७५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्री. गणेश शिंदे, श्री. श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सपोनि महेश इंगोले व पथकातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

# लॉटरीतून ठरणार महापौर; सत्तासमीकरणे बदलण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** महानगर पालिका निवडणुकांचा बिगुल वाजल्यानंतर आता महापौरपदाच्या आरक्षणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यंदा महापौरपद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होणार, याबाबत विविध तर्क–वितर्क लढविले जात असून लॉटरी पद्धतीने होणाऱ्या सोडतीमुळे सर्व अंदाज फोल ठरण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेत सर्वाधिक जागा मिळवणाऱ्या पक्षाचा महापौर होतो, हीसर्वसाधारण प्रथा असली तरी आघाडी




किंवा युती झाल्यास मित्रपक्षालाही महापौरपद देण्यात येते. त्यामुळे हेपद मिळवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.निवडणूक आयोगाने सोमवारी (ता. १५) महापालिका निवडणुकांची घोषणा केली असली तरी महापौरपदाचे आरक्षण अद्याप जाहीर झालेले नाही.

येत्या एक–दोन दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली आहे.महापौरपदाचे आरक्षण यंदा 'शून्य' झाल्यामुळे यावेळी रोस्टर पद्धतीऐवजी लॉटरी पद्धतीने सोडत काढण्यात येणार आहे.यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, सर्वसाधारण महिला तसेच खुला प्रवर्ग अशा सर्वच प्रवर्गाच्या चिठ्ठ्या टाकण्यात येणार असून त्यातून निघणाऱ्या चिठ्ठीवर महापौरपदाचे आरक्षण निश्चित होणार आहे.अमरावती महानगरपालिकेत २०२६ मध्ये १७ वा महापौर निवडून येणार आहेत. मागील पंचवार्षिक कालावधीत अनुसूचित जाती व ओबीसी प्रवर्गासाठी प्रत्येकी अडीच वर्षांचे आरक्षण लागू होते. यंदा कोणत्या प्रवर्गाला संधी मिळते, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे आणि इच्छुकांचे लक्ष लागून राहिले आहे.

### आतापर्यंत झालेले पक्षनिहाय महापौर

अमरावती महानगरपालिकेचे सभागृह १९९२ मध्ये अस्तित्वात आले. प्रारंभी महापौरपदाचा कार्यकाळ एक वर्षाचा होता. काँग्रेसचे डॉ. देवीसिंह शेखावत हे अमरावतीचे पहिले महापौर ठरले. त्यानंतर प्रभाकर सव्वालाखे व गोविंद अग्रवाल यांनी काँग्रेसकडून हे पद भूषविले.

त्यानंतर विलास इंगोले, दिपाली गवळी, मिलिंद चिमोटे, अशोक डोंगरे व वंदना कंगाले हेही काँग्रेसचे महापौर राहिले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून ॲड. किशोर शेळके व चरणजीतकौर नंदा, तर भारतीय जनता पक्षाकडून विद्याताई देशपांडे, किरण महल्ले, संजय नरवणे आणि चेतन गावंडे यांनी महापौरपद भूषविले आहे.

# महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीचा सखोल आढावा

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावती महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी,२०२६ रोजी मतदान तर १६ जानेवारी,२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. अमरावती महानगरपालिकेच्या ८७ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. महानगरपालिकेच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. अमरावती महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेची तयारी, नियोजन व अंमलबजावणी यांचा सखोल आढावा घेण्यासाठी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. ही बैठक महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे पार पडली. अमरावती महानगरपालिकासाठी १५ जानेवारी,२०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० यावेळेत मतदान होणार आहे.निवडणूक कार्यक्रम जाहिर झाल्यापासून अमरावती महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. अमरावती महानगरपालिकेमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमुळे प्रत्येक प्रभागात चार जागा तर प्रभाग क्र.९ मध्ये तीन जागा राहणार आहे.अमरावती महानगरपालिका निवडणूकीत ऑफलाईन पध्दतीने नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील. अमरावती महानगरपालिका निवडणूकीसाठी ६ लाख ७७ हजार १८० मतदार असून त्यानुसार मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) मागणी करण्यात आली आहे.अमरावती महानगरपालिका निवडणूक मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदार जागृती करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. अमरावती महानगरपालिका क्षेत्रात नाविण्यपुर्ण उपक्रम राबवून मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या



सुचना यावेळी त्यांनी दिल्या. मतदान केंद्रावर जेष्ठ नागरीक, दिव्यांग, तान्हाबाळासह असणा–या स्त्रिया, गरोदर स्त्रिया, आदींना मतदानासाठी प्राधान्य देण्याचे निर्देशही या बैठकीत देण्यात आले. काही ठिकाणी पिंक मतदान केंद्र तयार करण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. अमरावती महानगरपालिका निवडणूकीसाठी मा.विभागीय आयुक्त यांनी ८ निवडणूक निर्णय अधिकारी व ७ सहाय्यक निवडणूक अधिकारी क्र.१ यांचे नाव कळविलेले आहेत, त्यानुसार प्रभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.१,२ व ३ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूकीसाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. आचारसंहिता कक्ष निर्माण करण्यात आला असून अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली. झोननिहाय आचारसंहिता दक्षता समिती कक्ष गठीत करण्यात आला आहे. माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती तयार करण्यात आली आहे.

पुरुष मतदार ३ लाख ३९ हजार १७७, महिला मतदार ३ लाख ३७ हजार ९३५, इतर ६८ असे एकुण ६ लाख ७७ हजार १८० मतदार राहणार आहे. अमरावती महानगरपालिकेत एकुण २२ प्रभाग तर एकुण ८७ जागा राहणार आहे. महिलांसाठी ४४ जागा, अनूसुचित जातीसाठी १५, अनूसुचित जमातीसाठी २, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी २३ आरक्षित आहे. उमेदवारांसाठी खर्च मर्यादा ९,००,००० रुपये आहे.

**महत्वाच्या तारखा**

१.नामनिर्देशनपत्र स्वीकारणे २३ डिसेंबर,२०२५ ते ३० डिसेंबर,२०२५२.नामनिर्देशनपत्रांची छाननी ३१ डिसेंबर, २०२५३.उमेदवारी माघारीची अंतिम मुदत २ जानेवारी,२०२६४.निवडणूक चिन्ह वाटप ३ जानेवारी, २०२६५.अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी,२०२६६.मतदानांचा दिनांक १५ जानेवारी, २०२६७. मतमोजणीचा दिनांक १६ जानेवारी, २०२६ मताधिकार मोबाईल ॲप महानगरपालिका निवडणूकांसाठीच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयी माहिती जाणून घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने मताधिकार हे मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिले आहे. ते सध्या फक्त गुगल प्ले स्टोअर वरुन डाऊनलोड करता येईल. या ॲपद्वारे मतदाराचे नाव शोधण्यासाठी मतदाराला दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यानुसार मतदाराचे संपूर्ण नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (एझखउ) क्रमांक नमूद करुन मतदार यादीतील नाव शोधता येईल. त्यानंतर जिल्हा आणि महानगरपालिकेच्या नावाची निवड केल्यानंतर आपले नाव दिसेल. याच ॲपच्या माध्यमातून आपले मतदान केंद्राचे ठिकाणही कळू शकेल. त्याचबरोबर आपल्या प्रभागातील उमेदवाराविषयी अधिक माहितीदेखील जाणून घेता येईल. मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://mahaseevoterlist.in/ हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करुन दिले आहे. त्यातील Search Name in Voter List वर क्लिक करुन ॲपप्रमाणे नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (एझखउ) क्रमांक नमूद करुन नाव शोधता येईल.

या बैठकीत झोननिहाय निवडणूक व्यवस्थापन, मतदान केंद्रांची निश्चिती, निवडणूक साहित्याचे नियोजन, मनुष्यबळ व्यवस्थापन, वाहतूक व सुरक्षा व्यवस्था, तसेच आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भीड व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी वेळेत आणि प्रभावीपणे पार पाडावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले.मतदारांना मतदान प्रक्रियेबाबत योग्य माहिती मिळावी यासाठी जनजागृती मोहिम राबविणे, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच मतदानाच्या दिवशी कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यावर आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी भर दिला.

निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असून कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.निवडणूक कामकाजाशी संबंधित संभाव्य अडचणी व त्यावरील उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली.

समन्वयाने काम केल्यास निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडता येईल, असे मत आयुक्तांनी व्यक्त केले.या आढावा बैठकीस उपायुक्त, निवडणूक अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख, निवडणूक कक्षातील अधिकारी, तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# नवसारी स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे मतमोजणी स्थळाची आयुक्त शर्मा चांडक यांच्याकडून पाहणी







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती–**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी नवसारी स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे उभारण्यात आलेल्या मतमोजणी स्थळाची सखोल पाहणी केली.या पाहणीदरम्यान आयुक्तांनी मतमोजणीसाठी तयार करण्यात आलेल्या सर्व कक्षांची प्रत्यक्ष तपासणी केली. मतमोजणी टेबलांची मांडणी, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्यासाठी असलेली बसण्याची व्यवस्था, माध्यम प्रतिनिधींसाठी राखीव कक्ष, तसेच मतमोजणी कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या मूलभूत सुविधांची त्यांनी माहिती घेतली. मतमोजणी दरम्यान कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व तयारी काटेकोरपणे करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.मतमोजणी केंद्रातील सुरक्षा व्यवस्थेवर विशेष भर देत आयुक्तांनी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रवेश व निर्गमन मार्ग, पोलीस बंदोबस्त तसेच ओळखपत्र तपासणी यंत्रणा यांचा आढावा घेतला. मतमोजणी प्रक्रियेची गोपनीयता आणि सुरक्षितता अबाधित राहील याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. याशिवाय अखंड वीजपुरवठा, जनरेटरची उपलब्धता, अग्निशमन यंत्रणा, वैद्यकीय सुविधा व आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजना यांचीही त्यांनी तपासणी केली.यावेळी आयुक्तांनी स्ट्राँगरूम, ऑब्झर्व्हर रूम, पार्किंग व्यवस्था, पोलीस नियंत्रण कक्ष तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बैठक व्यवस्थेची पाहणी केली. सर्व बाबींमध्ये योग्य व शिस्तबद्ध नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.मतमोजणीच्या दिवशी अधिकारी, कर्मचारी, उमेदवारांचे प्रतिनिधी व माध्यम प्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहावा, तसेच कोणत्याही प्रकारचा गोंधळ अथवा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पूर्वनियोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नमूद केले. सर्व संबंधित विभागांनी आपापली जबाबदारी वेळेत आणि दक्षतेने पार पाडावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, निवडणूक विभागाचे अधिकारी, महानगरपालिकेचे विविध विभागप्रमुख तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते. मतमोजणी प्रक्रिया शांततेत, पारदर्शकतेने व नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचा विश्वास आयुक्तांनी यावेळी व्यक्त केला.

# मोसीकॉलच्या १० एकर जागेत बाजार उभारा

## माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती –**

शहरातील चौधरी चौक ते विलास नगर रोडवर डाव्या बाजूला असलेल्या मध्यवस्तीत विलास नगर लगत शासनाचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र राज्य तेलबिया, व्यापार व औद्योगिक महामंडळाची (मोसीकॉल) अंदाजे २२ ते २४ एकर विस्तीर्ण जागा उपलब्ध आहे. यापैकी १० एकर जागेवर वाढत्या अमरावती शहराची गरज लक्षात घेऊन नवीन बाजार तयार करण्यात यावा, अशी मागणी माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केली आहे.

महामंडळ आता या जागेची जसे आहे तसे, जिथे आहे तिथे, जे काही आहे ते आणि कोणताही परतावा/दावा नाही या तत्त्वावर विक्री करणार असल्याची निविदा नुकतीच प्रकाशित झाली आहे. शहरांमध्ये गेल्या ७०- ८० वर्षांपासून इतवारा बाजार व शुक्रवारी बाजार असे दोनच पारंपारिक बाजाराच्या जागा निश्चित करण्यात आलेले आहेत. इतक्या वर्षात अमरावती शहराचा कैक पटीने वाढलेला विस्तीर्ण व्याप व लोकसंख्येच्या दृष्टीने हे दोन्ही बाजार अपुरे असून सार्वजनिक वापराच्या नवीन बाजाराची आवश्यकता आहे. असे असताना शासनाचा उपक्रम असलेल्या महामंडळाच्या मालकीची ही जागा पूर्णतः विक्री न करता यातील किमान १० एकर जागा महानगरपालिकेद्वारे विकास योजनेमध्ये आरक्षित करून चौधरी चौक, कॉटन मार्केट विलास नगर रोड, गाडगेनगर या रस्त्यावरील अनधिकृत भाजीपाला विक्रेते व अन्य हॉकर्स यांच्यासाठी येथे नव्याने सुसज्ज बाजाराचे निर्माण करावे. शहरात रस्तोरस्ती बोकाळलेल्या अनधिकृत हॉकर्सची गर्दी कमी करून वाहतूक व्यवस्था सुधारण्याची सुद्धा ही नामी संधी आहे. परंतु, लोकप्रतिनिधी शहराच्या विकासाची बुज राखून या दिशेने प्रयत्न करणार काय हा खरा सवाल आहे. नव्हे तर हे त्यांचे जनतेप्रती असलेले उत्तरदायित्वच आहे. पण त्यांचे प्राधान्यक्रम वेगळेच असल्याने ते त्यातच मश्गूल असल्याचे चित्र आहे. एकेकाळी शहराच्या मध्यवस्तीतील हा भाग आहे. येथे असलेल्या कापूस प्रक्रिया, जिनिंग प्रेसिंग इत्यादी उद्योगामुळे भरभराटीला आलेला होता येथे मोसीकॉल, शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था, तिवसा जीनिंग फॅक्टरी, एदलजी फ्रॉमजी



दोटीवाला जिनिंग फॅक्टरी, नेमानी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी, लड्ढा जिनिंग या उद्योगामुळे कापूस प्रक्रिया क्षेत्रात सुवर्णकाळ गाजवलेला हा परिसर आहे. परंतु कालौघात हे उद्योग डबघाईस घेऊन बहुतांश उद्योग आता बंद पडले आहे.श्ररपव ळप ीीळलेश्र मागे शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीच्या जागेचे सुद्धा असेच व्यावसायिकरण करून ही संपूर्ण जागा अनेक बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांच्या घशात घालून आपले उखळ पांढरे करून घेतल्याची उदाहरणे आहेत. आता अंदाजे २५ एकराचा हा मोठा भूखंड जो की शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेल्या महामंडळाच्या मालकीचा असून तो आता विक्री करून तेथे व्यावसायिक स्वरूपाचे बांधकाम करण्याचे प्रयोजन असल्याचे निश्चित झालेले आहे. दिसली जागा की त्याची विक्री करायची किंवा त्याचा आपल्या व्यापारी मित्रमंडळींना विक्री करून व्यावसायिक लाभ मिळवून द्यायचा याची जणू शहरात लोकप्रतिनिधींमध्ये स्पर्धा लागल्याचे चित्र आहे. नेहरू मैदान येथे प्रस्तावित व्यापारी संकुल व अन्य सरकारी जागा व्यावसायिकांच्या घशात घालण्याच्या प्रयत्न होत असल्याचे अमरावतीकर अनुभवत आहेत. मोसीकॉलच्या १० एकर जागेवर बाजार उभारा अशी मागणी डॉ. सुनील देशमुख यांनी केली आहे.

# खऱ्या भक्तीचा मार्ग दाखविणारे श्री संत गाडगेबाबा हे चालते-बोलते विद्यापीठ

## पुण्यतिथी महोत्सवादरम्यान पंकज महाराज पोहोकार यांचे निरुपण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–**

कोणतेही अवडंबर न करता एक गाडगं, एक काठी, कानात कवडी व अंगावर चिंध्या पांघरुण या समाजाला अंधश्रद्धेच्या खाईतून काढून ख-या भक्तीचा मार्ग दाखविणारे श्री संत गाडगेबाबा हे चालते-बोलते विद्यापीठ होते, अशी माहिती हभप पंकज महाराज पोहोकार यांनी त्यांच्या किर्तनातून मांडली.

श्री संत गाडगेबाबा यांचा ६९ वा पुण्यतिथी महोत्सव बाबांच्या समाधीस्थळी सुरु आहे. यावेळी सादर झालेल्या प्रथम कीर्तनसेवेत हभप पंकज महाराज पोहोकार यांनी गाडगेबाबांबाबत अभ्यासपूर्ण विवेचन केले. त्यांच्या मते आज देवाला सुद्धा आदर्श माणसाची गरज आहे. डॉक्टर, वकील, इंजिनिअर होणे सोपे झाले, पण माणूस होणे कठीण झाले आहे. यावेळी त्यांनी कविश्रेष्ठ सुरेश भट यांची एक कविताही सादर केली. ती अशी, गर्दीत माणसाच्या माणूस शोधतो मी.. कोलाहलात माणसाच्या माणूस शोधतो मी, ही देव देवळे सारी फिरून आलो.. भिंतीपल्याड त्यांच्यात माणूस शोधतो मी.महाराजांच्या सांगण्यानुसार गाडगेबाबांचे किर्तन हे उत्तम, आदर्श, सुसंस्कृत माणूस बनवण्याचा कारखाना आहे. स्वछता, देव ,धर्म, अंधश्रद्धा, रूढी आणि माणूस हे विषय त्यांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. देवधर्म व देवधर्म सांभाळा हा काळाचा इशारा आहे. म्हणून गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला हे ईश्वर स्मरणच आजच्या तरुण पिढीला व समाजाला वाचवू शकते, असेही पोहोकार महाराज यांनी सांगितले. दरम्यान गाडगे महाराज पुण्यतिथी महोत्सवाचा दुसरा दिवसदेखील पुरणपोळीने साजरा झाला. अंध, अपंग, निराश्रित वृद्धांना जेवन वितरित करण्यात आले. आश्रयदाते कुऱ्हे आप्पाजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे अन्नदान करण्यात आले. संस्थेचे विश्वस्त तथा गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांच्यासह संस्थेचे सागर देशमुख, भरतभाऊ रेडे, व्यवस्थापक प्रकाश महात्मे, किशोर चौधरी, सुधीर धोंगडे, विठ्ठल तेलमोरे, अतुल रेडे, गजानन देशमुख आदींनी परिश्रम घेतले.



## अंबादेवी संस्थानतर्फे राकेश ओला यांचाा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**. नवनियुक्त पोलीस आयुक्त पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आपल्या पदाचा पदभार घेतल्यानंतर श्री अंबादेवींचे दर्शन घेतले . यावेळी विश्वस्त अँड. राजेंद्र पांडे यांनी संस्थानतर्फे सत्कार केला. याप्रसंगी राजापेठ व सिटी कोतवाली चे पोलिस निरीक्षक उपस्थित होते.

# परिक्षेला १,१९८ विद्यार्थी; १४५ जणांची दांडी

## दर्यापूरातील ३ केंद्रांवर सुरळीतपणे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

केंद्र सरकार संचालित पीएमश्री नवोदय विद्यालयात आगामी शैक्षणिक वर्षात सहावी साठीची प्रवेश परीक्षा नुकतीच दर्यापूर शहरातील ३ परीक्षा केंद्रावर शांततेत पार पडली. या परीक्षेसाठी १ हजार ३३८ विद्याथ्यर्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ३ केंद्रांवर १ हजार १९८ विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेचा पेपर दिला. तर परीक्षेसाठी ३ केंद्रांवरील जवळपास १४५ विद्यार्थ्यांची गैरहजेरी दिसून आली.

दर्यापूर शहरातील ३ केंद्रांवरील परीक्षेसाठी तब्बल १ हजार ३३८ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज केल्याने अर्जाची संख्या मागील वर्षीच्या तुलनेत जास्त अर्ज आले होते. त्यामुळे अमरावतीच्या नवोदय विद्यालयात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता सहावीसाठी होणाऱ्या परीक्षेसाठी मोठी रस्सीखेच होणार आहे. परीक्षा केंद्रावर परीक्षार्थीनी प्रवेशपत्र, परीक्षा लेखन साहित्य व ओळखपत्रासह उपस्थित राहण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे शनिवारी सकाळी ९ वाजता पासूनच अनेक पालक आपल्या पाल्यांसह शहरात येताना दिसत होते. सकाळी १० वाजता विविध केंद्रावर पालकांसह विद्यार्थ्यांची गर्दी झाल्याचे चित्र दिसत होते. सकाळी १० वाजता पासूनच पालकांनी पाल्यांना सोडण्यासाठी शहरातील परीक्षा केंद्रांवर गर्दी केली होती.थंडीतही केंद्रावर गर्दी थंडीमय वातावरणामुळे आपल्या वाहनातून अनेकजण आल्याने परीक्षा केंद्रासमोर लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. किमान एक तास आधी येण्याच्या सूचना दिल्याने ग्रामीण भागांसह शहरी भागातील पालकांनी सकाळी ९ वाजता पासूनच हजेरी लावली.

शंभर गुणांची परीक्षा शंभर गुणांसाठी घेण्यात आलेल्या या परीक्षेत एकूण ८० प्रश्न विचारण्यात आले होते. अर्थात एका प्रश्नासाठी १.२५ गुण होते. तसेच नवोदय परीक्षेचा पेपर सुटल्यानंतरही विद्यार्थ्यांना घेण्यासाठी पालकांची दुचाकी, चारचाकीसह गर्दी दिसून आली.

# चिखलदर्यात सुविधा उभारा, पर्यटन वाढवा

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती –** जिल्ह्यात चिखलदरा हे महत्वाचे पर्यटनस्थळ आहे. प्रामुख्याने नैसर्गिक आणि वन्यप्राणी पाहण्यासाठी जंगल सफारी हे प्रमुख आकर्षण आहे. त्यामुळे याठिकाणी विकासात्मक पायाभूत सुविधा उभाराव्यात, तसेच येथे येणार्या पर्यटकांच्या करमणुकीसाठी साधने उभारल्यास पर्यटक मुक्कामासाठी थांबण्यास मदत होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पायाभूत सुविधा आणि चिखलदरा पर्यटनाबाबत आढावा घेण्यात आला.

यात चिखलदरा येथील पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने विविध विभागाच्या वतीने राबविण्यात येणार्या सुविधांची माहिती घेण्यात आली. चिखलदरा येथे सिडकोमार्फत स्कायवॉक उभारण्यात येत आहे. स्कायवॉक उभारणीत अडचणी आल्याने काम पूर्ण करण्यासाठी स्कायवॉकच्या मध्यभागी जमिनीतून आधार देणे आवश्यक आहे. यासाठी तात्पुरता पाया उभारण्यात येणार आहे. गोल रस्त्याचे काम करण्यात येणार असून यात वन विभागाच्या जागेवर तोडगा काढण्यात येणार आहे. याठिकाणी निसर्ग पर्यटनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी सादरीकरण करण्यात आले. चिखलदरा येथेच साहसी खेळाची अॅकॅडमी उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. तसेच कोलकास येथे कोरकू यांच्या जीवनावर आधारीत केंद्र उभारण्यात



येणार आहे.

चिखलदरा येथे येणारा पर्यटक याठिकाणी थांबावा, यासाठी लाईट इफेक्ट गार्डनची सूचना करण्यात आली. मात्र याठिकाणी वन्य प्राण्यांचा वावर असल्याने ही बाब तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. गाविलगड किल्ल्याचा विकास पुरातत्व विभागाच्या सल्ल्यानुसार करावा. आमझरी हे मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे येथे प्रशिक्षण आणि इतर सुविधा उभारण्यात याव्यात. यासोबतच मेळघाटातील २२ गावांमध्ये वीज पोहोचण्यासाठी वनविभागाच्या सर्व परवानगी घ्यावी. पीएम मित्रा पार्कमध्ये विज उपकेंद्रासाठी जागा मिळणार आहे. त्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. मोर्शी आणि वरूड भागासाठी संत्रा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात यावी. याठिकाणी कार्यरत जैन आणि एमकेसी यांच्यासोबत समन्वय राखण्यात येणार आहे.

# बनावट वेबसाईट्स, ॲप्सपासून सावध रहा

## प्रादेशिक परिवहन विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** अलीकडी काळात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन आदी सेवांशी संबंधित बनावट वेबसाईट्स, फसवे मोबाईल ॲप्स तसेच खोट्या लिक्सच्या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे प्रादेशिक परिवहन विभागाच्या लक्षात आले आहे. या प्रकारांमुळे वाहन चालक व मालकांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी तसेच नागरिकांच्या ओळखीचा गैरवापर होत असल्याचे आढळून आले आहे.त्यामुळे बनावट वेबसाईट व ॲप्स पासून सावधान राहण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे परिवहन विभागाने जारी केलेल्या एका पत्रकात सांगण्यात आले की, विभागाशी संबंधित सेवांसाठी नागरिकांनी केवळ अधिकृत शासकीय संकेतस्थळांचाच वापर करावा, वाहन नोंदणीसाठी V-H-N https://vahan.parivahan.gov.in, SARATHI https://sarathi. parivahan. gov.in nadh https://www.parivahan.gov.in , https://echallan.parivah an.gov.in या अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा. ही सर्व संकेतस्थळे 'ज्ञर्सीं.ळपश्र' या डोमेनने समाप्त होतात. ज्ञज्ञ.लेश्रश्र, ज्ञ ज्ञ .` प श्र ळ प श श्र श्र , ज्ञज्ञ.ीळींशश्रश्र, ज्ञज्ञ.ळपश्रश्र अशा डोमेनवरील कोणत्याही वेबसाईटवर नागरिकांनी व्यवहार करू नयेत.




फसवणूक करणाऱ्यांकडून बहुधा आपल्या वाहनावर चलन बाकी असून त्वरित दंड भरा'' किवा kkDL सस्पेंड होणार आहे, त्वरित तपासणी करा' अशा धमकीवजा संदेशांसह अनधिकृत लिक्स पाठविल्या जातात. परिवहन विभाग किवा फळडकडून कधीही WhatsA pp द्वारे पेमेंट लिक पाठविली जात नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.तसेच 'ज्ञठढज डर्शीीळलशी.रज्ञिश्रश्र, ज्ञ ज्ञा झ री ळ ीं र ह र प - ण वि रीं श . र ज्ञि श्र श्र , ज्ञज्ञशउहरश्रश्ररप-रि.रज्ञिश्रश्र यांसारखी अनधिकृत ॲप्स डाउनलोड करू नयेत. अशा ॲप्सद्वारे डळढ, बँकिग तपशील व मोबाईलमधील संवेदनशील माहिती चोरीला जाण्याची शक्यता असते. कोणताही संशयास्पद संदेश किवा लिक प्राप्त झाल्यास नागरिकांनी तात्काळ National Cyber Crime Portal https:// www. cyber crime.gov.in वर तक्रार नोंदवावीकिवासायबर फसवणूक हेल्पलाइन १९३० तसेच जवळच्या जिल्हा सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले आहे.

# एकीने लढल्यास धनगर आरक्षणाला यश: दीपक बोऱ्हाडे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी सुरू असलेला संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. २१ जानेवारी रोजी मुंबईत 'पिवळं वादळ' धडकणार असल्याची ठाम घोषणा धनगर आरक्षण संघर्षाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी केली. 'एकानं काही होत नाही, एकीनं लढावं लागतं, असे त्यांनी देऊळगाव मही येथे आयोजित कार्यक्रमात सांगून संपूर्ण समाजाला निर्णायक संघर्षासाठी सज्ज होण्याचे आवाहन बोऱ्हाडे यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला एसटी



आरक्षणाच्या अंमलबजावणीचे आश्वासन दिले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शब्द दिला आहे, असे स्पष्ट करत बोऱ्हाडे म्हणाले की, तो शब्द पूर्ण होईपर्यंत आमचा संघर्ष थांबणार नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी दीपक बोऱ्हाडे म्हणाले की,'हा लढा माझा वैयक्तिक नाही, तर संपूर्ण समाजाचा आहे. चार आयोगांचे अडथळे, न्यायालयीन संघर्ष आणि अनेक अडचणी असूनही हा लढा थांबलेला नाही. सत्याच्या मार्गावर चालणाऱ्या या लढ्याला कुठलीही ताकत थांबवू शकत नाही.' माझी गाडी फोडली, माझ्यावर खोटे गुन्हे दाखल झाले. आंदोलन दडपण्याचे अनेक डाव रचले गेले. पण आम्ही कसल्याही षडयंत्राला बळी पडणार नाही आणि धमक्यांना भीक घालणार नसल्याचे हि ते यावेळी म्हणालेत.

# काँग्रेस आमदार प्रज्ञा सातव यांचा भाजप प्रवेश ठरला?

## काँग्रेसला तगडा झटका; प्रज्ञा ह्या काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७हिंगोली**

काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आमदार प्रज्ञा सातव यांचा भाजप प्रवेश निश्चित झाल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, त्या लवकरच भाजपमध्ये प्रवेश करतील. प्रज्ञा सातव ह्या काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आहेत. त्या सध्या विधानपरिषदेच्या सदस्या आहेत. त्यामुळे भाजपने त्यांना आपल्या पक्षात घेणे निश्चित केले असेल तर तो काँग्रेससाठी एक जबर झटका ठरेल.

यासंबंधीच्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्यात मोठी राजकीय उलथापालथ सुरू झाली आहे. काँग्रेसचा एक बडा नेता भाजपाच्या गळाला लागला आहे. पुढील काही दिवसांतच त्या नेत्यासह कार्यकर्त्यांचा भाजपा प्रवेश होणार असल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. त्यासाठी संबंधित नेत्याने त्यांच्या मोजक्याच कार्यकर्त्यांना तातडीने मुंबईत पोहोचण्याचा संदेश दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. हा बडा नेता म्हणजे आमदार प्रज्ञा सातव असल्याचे सांगण्यात येत आहे.



**गत ४ महिन्यांत हिंगोलीत मोठी उलथापालथ**

उल्लेखनीय बाब म्हणजे हिंगोली जिल्ह्यात मागील ४ महिन्यांत मोठ्या राजकीय उलथापालथी झाल्या आहेत. काँग्रेसचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी काँग्रेसला रामराम ठोकत शिंदेसेनेत प्रवेश केला. त्यामुळे शिंदेसेनेला सेनगाव व हिंगोली तालुक्यात मोठे बळ मिळाले. त्यानंतर पालिका निवडणुकीच्या तोंडावरच राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) काही माजी नगरसेवकांनी शिंदेसेनेत प्रवेश केला. या शिवाय शरद पवार गटाचेच जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्यासह माजी नगरसेवकांनीही नुकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

**हिंगोलीहून कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने रवाना**

त्यानंतर आता हिंगोली जिल्ह्यातील काँग्रेसचा एक चेहरा भाजपाच्या गळाला लागला आहे. त्यासाठी मुंबईत राजकीय हालचाली सुरु झाल्याचे सूत्रांनी सांगितले. भाजपमध्ये जाणाऱ्या या नेत्याने त्यांच्या काही निवडक कार्यकर्त्यांना मुंबईत पोहोचण्याचे संदेश पाठविले आहेत. त्यानुसार काँग्रेसचे काही कार्यकर्ते बुधवारी ता. १७ मुंबईकडे रवाना झाले आहेत. आता या कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच नेत्याचा भाजपा प्रवेश होणार असल्याची चर्चा आहे.

**पुढील काही दिवसांतच पक्षप्रवेश**

मुंबईकडे रवाना झालेल्या काही कार्यकर्त्यांनी आपल्याला नेत्याने मुंबईत बोलावल्याचे स्पष्ट केले. पण त्यांचा भाजपा प्रवेश आहे किंवा नाही याची माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. तूर्तास या पक्ष प्रवेशाबाबत कमालीची गोपनीयता बाळगली जात आहे. पण पुढील काही दिवसांतच हा पक्ष प्रवेश होईल अशीही खात्रीलायक माहिती आहे. या चर्चेमुळे आता राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे.

# भाजप उमेदवाराच्या कार्यालयावर गोळीबार

## निवडणुकीच्या रणधुमाळीत अंबरनाथ हादरले; मुख्यमंत्र्यांच्या सभेचे नियोजन सुरू असताना घडली घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अंबरनाथ**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना अंबरनाथ शहरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार पवन वाळेकर यांच्या जनसंपर्क कार्यालयावर अज्ञात व्यक्तींनी मध्यरात्री गोळीबार केल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या हल्ल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. अंबरनाथ पश्चिमेतील शंकर मंदिर परिसरात असलेले हे कार्यालय नेहमीच नागरिकांच्या व कार्यकर्त्यांच्या वर्दळीचे केंद्र असते. त्यामुळे भरवस्तीत अशा प्रकारचा गोळीबार झाल्याने सामान्य नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



ही घटना मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घडल्याची प्राथमिक माहिती आहे. प्रत्यक्षदर्शी आणि सीसीटीव्ही फुटेजनुसार, दुचाकीवरून आलेले दोन अज्ञात इसम अचानक कार्यालयासमोर थांबले आणि क्षणाचाही विलंब न करता कार्यालयाच्या दिशेने ३ ते ४ राऊंड फायर केले. गोळीबाराचा आवाज ऐकताच कार्यालयातील सुरक्षारक्षक बाहेर आला. मात्र, त्यालाही लक्ष्य करून हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्याचे समोर आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र सुरक्षारक्षक जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या संपूर्ण घटनेचे दृश्य कार्यालयाबाहेर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाले असून, हल्लेखोरांचा थरारक प्रकार त्यात दिसून येतो.

निवडणूक प्रचार जोरात सुरू असताना उमेदवाराच्या कार्यालयावर झालेला हा हल्ला म्हणजे दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप भाजप कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने अंबरनाथ पोलिस ठाण्यात दाखल झाले. दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला आहे. परिसरातील इतर कॅमेरे, मोबाईल लोकेशन आणि दुचाकीचा मार्ग तपासण्याचे काम सुरू असून, लवकरच आरोपींना ताब्यात घेतले जाईल, असा विश्वास पोलिस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका पुढे ढकलल्या

## सर्वात आधी होणारी निवडणूक आता सर्वात शेवटी, इच्छुकांचा हिरमोड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

जिल्हा परिषद (जि.प.) आणि पंचायत समिती (पं.स.) निवडणुका सर्वात आधी होतील अशी अपेक्षा असताना, त्या आता सर्वात शेवटी ढकलण्यात आल्या आहेत. अध्यक्षपदाचे रोस्टर, मतदार यादीची अंतिम घोषणा आणि राखीव मतदारसंघ निश्चित झाल्याने सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणुका लवकर होतील असे गृहीत धरले होते. निवडणूक आयोगानेही तशी तयारी केली होती, मात्र आता इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.



सर्वोच्च न्यायालयाने सप्टेंबर महिन्यात दिलेल्या निर्देशानुसार, नगरपालिका-नगरपंचायती, महापालिका आणि जिल्हा परिषद-पंचायत समिती या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करायच्या आहेत. यासाठी राज्य सरकार आणि निवडणूक आयोग या दोन्ही यंत्रणांनी ऑक्टोबरपासूनच तयारी सुरू केली होती. महापौर, जिल्हा परिषद व नगरपालिकांचे अध्यक्षपद, मतदारसंघांची रचना आणि आरक्षण निश्चित करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर होती, तर मतदार यादी, प्रत्यक्ष मतदान आणि मतमोजणी निवडणूक आयोगाला पूर्ण करायची होती.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठीच्या मतदान आणि मतमोजणीआधीच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. मतदारसंख्येनुसार आवश्यक असलेली मतदान यंत्रे (बॅलेट व कंट्रोल युनिट्स) देखील संबंधित तालुक्यांमध्ये पाठवण्यात आली आहेत. असे असूनही, या निवडणुकांची तारीख अद्याप घोषित झालेली नाही. याउलट, महापौरपदाचे आरक्षण निश्चित व्हायचे असतानाही महापालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत, तर आयोगाने यापूर्वीच नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे पुढे ढकललेल्या जि.प., पं.स. निवडणुका कधी होणार, असा प्रश्न इच्छुकांकडून विचारला जात आहे.

राजकीय तज्ज्ञांनुसार, या विलंबामागे दोन प्रमुख कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा मतदार हा ग्रामीण भागातील असतो. दीड-दोन महिन्यांपूर्वी राज्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले होते. दिवाळी तोंडावर आली असतानाही अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची मदत पोहोचली नव्हती. या नाराजीचा फटका निवडणुकीत बसू नये, यासाठी जि.प. पं.स. निवडणुकांकडे काहीसे दुर्लक्ष केले गेले असावे.

दुसरे कारण असे की, नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुका घोषित करतानाच कदाचित जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकाही घोषित केल्या जातील असे वाटले होते. परंतु, आरक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक झाल्याचे कारण पुढे करून ही निवडणूक पुन्हा थांबवण्यात आली. मात्र, त्याचवेळी न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नगरपालिका व पंचायतींच्या निवडणुका घेण्याची मुभा देण्यात आली होती, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी १५ जानेवारी २०२६ पर्यंत ई-पीक पाहणी पूर्ण करा : तहसीलदार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७दर्यापूर**

खरीप व रब्बी हंगाम २०२५-२६ मधील पिकांची नोंद सातबारा उतार्यावर करण्यासाठी 'ई-पोक पाहणी' प्रकल्पांतर्गत पीक नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२६ पर्यंत आहे. दर्यापूर तालुक्यातील ज्या शेतकर्यांनी अद्याप आपल्या पिकांची नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती विहित मुदतीत पूर्ण करावी, शेतकर्यांनी आपल्या मोबाईलमधील 'ई-पीक पाहणी (४४०५) अँप चा वापर करून स्वतःच्या पिकाची माहिती भरावयाची आहे. ई-पीक पाहणी मुळे सातबारा अद्ययावत होणे, ई-पीक पाहणीमुळे सातबारा उतार्यावर पिकाची अचूक नोंद होते, ज्यामुळे तो कायदेशीर पुरावा मानला जातो,शासकीय योजनांचा लाभ पीक विमा, पीक कर्ज आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये मिळणारी मदत मिळवण्यासाठी ई-पीक पाहणीची नोंद अनिवार्य आहे, तालुक्याचा आणि राज्याचा अचूक पीक पेरा निश्चित करण्यासाठी या माहितीचा उपयोग होतो, ज्याचा फायदा भविष्यात शेतीविषयक धोरणे ठरवताना होतो,शेतकर्याने स्वतः माहिती भरल्यामुळे यात पारदर्शकता राहते आणि प्रशासकीय फेर्या मारण्याची गरज उरत नाही रब्बी हंगामासाठी पीक पाहणीची अंतिम तारीख १५ जानेवारी २०२६ आहे. यानंतर ई-पीक पाहणीचे पोर्टल बंद होईल. तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता तात्काळ नोंदणी करावी.ज्या शेतकर्यांना प वापरण्यास अडचण येत असेल त्यांनी आपल्या गावातील तलाठी, कृषी सहाय्यक किंवा नजीकच्या महा-ई-सेवा केंद्राशी संपर्क साधावा असे डॉ. रविंद्रकुमार कानडजे तहसीलदार, दर्यापूर यांनी केले आहे.

# नेरपिंगळाईतील वॉर्ड क्र. ५ समस्यांचे माहेरघर

## नागरिकांचा पंचायत समिती-जिल्हा परिषद निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नेरपिंगळाई**

नेरपिंगळाई गावातील वॉर्ड क्रमांक ५ (श्रावण नगरी, ओंकार नगरी परिसर) हा गेल्या अनेक दिवसांपासून मूलभूत समस्यांनी ग्रासला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गावाचे कामकाज ग्रामपंचायतीअंतर्गत चालत असताना पाणीपुरवठा, रस्ते, नाल्या व साफसफाई ही जबाबदारी ग्रामपंचायतीची असतानाही या परिसरात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे.परिसरातील रस्त्यांची दुरवस्था, नाल्यांची साफसफाई न होणे, पाणीपुरवठ्याची अडचण अशा समस्यांबाबत नागरिकांनी अनेक वेळा निवेदने दिली. मात्र मागण्या पूर्ण न झाल्याने अखेर नागरिकांनी येणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.दरम्यान, ग्रामसेवक विनोद मनवर यांनी येत्या १० तारखेपर्यंत परिसरात पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन नागरिकांना दिले आहे. मात्र, आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# अमरावतीतील रेंजवर एकाच वेळी ३६ धनुर्धर भेदणार लक्ष्य

## ४८५ खेळाडू, संघ व्यवस्थापक, निवड समिती सदस्यांसह विभागाचे खेळाडू सहभागी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे १७ व १९ वर्ष मुले व मुलींच्या राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन १८ ते २० डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. गुरूवार १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या खेलो इंडिया आर्चरी आंतरराष्ट्रीय रेंजवर स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या अर्चरी रेंजवर होणार असून येथे एकाचवेळी ३६ धनुर्धर लक्ष्याच्या दिशेने तीर सोडू शकतात, अशी सोय आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी धनुर्धरांसाठी सर्वच सुविधाही उपलब्ध आहेत. त्यामुळे येथे सातत्याने राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन होत असते. त्याचप्रमाणे राज्यातील ८ महसूल विभाग आणि १ क्रीडा प्रबोधिनी, पुणे अशा एकूण ९ विभागांतील १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली यात सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी सुमारे ४८५ खेळाडू, संघव्यवस्थापक, प्रशिक्षक आणि निवड समिती सदस्य उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, राज्य ऑलिम्पिक संघटनेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. प्रशांत देशपांडे, राज्य धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर उपस्थित राहतील.

जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा होणार सत्कार उद्घाटन समारंभात आर्चरी खेळातील आंतरराष्ट्रीय खेळाडू तुषार शेळके, मानव जाधव, कुमकुम मोहोड, यशदिप भोगे, मधुरा धामणगांवकर, पुर्वशा शेंडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तुषार शेळकेने रिकर्व्ह प्रकारात आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सांघिक रौप्य पदक जिंकून दिले आहे. त्याचप्रमाणे मानव जाधव, कुमकुम मोहोड, यशदीप भोगे, मधुरा धामणगांवकर व पुर्वशा शेंडे यांनीही सातत्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धा, विश्वचषकात पदकांची कमाई केली आहे.

झारखंड, मणिपूर येथील स्पर्धेसाठी संघ निवड निवड समिती निरीक्षण करून महाराष्ट्र राज्याच्या १७ व १९ वर्ष मुले व मुलींच्या संघाची निवड करतील. महाराष्ट्र राज्याचा संघ २० डिसेंबर रोजी सायंकाळी घोषित करण्यात येणार आहे. निवड झालेल्या संघातील खेळाडू झारखंड व मणिपूर येथे होणाऱ्या ६९व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेत प्रतिनिधित्व करतील. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना मेडल्स व प्राविण्य प्रमाणपत्रे. सर्व सहभागी खेळाडूंना स्पर्धा सहभाग प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येणार आहे.

# मेळघाटातील मका खरेदीसाठी दोन नवीन केंद्रे

## शिक्षण, आरोग्याच्या प्रश्नांवरही आदिवासी शेतकऱ्यांशी समेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मेळघाट**

मेळघाटातील आदिवासी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मका खरेदीसाठी सेमाडोह आणि राहू येथे दोन नवीन केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, मेळघाटातील शिक्षण, आरोग्य आणि वन विभागाशी संबंधित समस्यांवरही तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.



यावर्षी मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर पायी मोर्चा काढला होता. त्यावेळी आदिवासी आयुक्तालयाच्या वरिष्ठ अधिकारी आयुषी सिंह यांनी आंदोलक शेतकऱ्यांच्या प्रतिनिधी मंडळाची भेट घेऊन अमरावती येथील आदिवासी विकास अपर आयुक्त (एटीसी) कार्यालयात बैठक घेण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार, मंगळवारी अमरावती येथे ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला आदिवासी विकास, महिला व बाल विकास, जिल्हा परिषद, शिक्षण, आरोग्य, महसूल, वने, महावितरण, सहकार, पुरवठा आणि एकात्मिक बालविकास यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावर्षी मेळघाटात मक्याचे पीक मोठ्या प्रमाणात आले आहे. मात्र, किमान आधारभूत किंमत २४०० रुपये प्रति क्विंटल असतानाही, मका कमी भावात खरेदी केला जात होता. शासनाने यापूर्वी ८ केंद्रे उघडली होती, परंतु ती अनेक आदिवासी शेतकऱ्यांसाठी गैरसोयीची ठरली होती. त्यामुळे राहू आणि सेमाडोह येथे नवीन केंद्रे सुरू करण्याची मागणी करण्यात आली, जी जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी तात्काळ मान्य केली. ही केंद्रे लवकरच कार्यान्वित होतील, असे त्यांनी सांगितले.

मका खरेदीच्या मुद्द्याव्यतिरिक्त, मेळघाट आणि अचलपूर परिसरातील आदिवासी व इतर समाज बांधवांच्या शिक्षण आणि आरोग्याच्या दयनीय स्थितीवरही चर्चा झाली. शालेय पोषण आहार आणि अंगणवाडीतील मुलांना पुरविल्या जाणाऱ्या आहारातील अडचणी सोडवण्याचेही यावेळी मान्य करण्यात आले. या संवाद बैठकीला एटीसी जितेंद्र चौधरी, मेळघाटचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, सहकार विभागाचे सुधीर मानकर, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, आदिवासी विकास राज्य सहकारी विभागाचे आमटे, वनखात्याचे अधिकारी तापस, महिला व बालविकास विभागाचे डेप्युटी सीईओ विलास मरसाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी आणि 'खोज' संस्थेचे प्रमुख ड. बंड्या साने यांच्या नेतृत्वाखाली अनेक शेतकरी उपस्थित होते.

# कवी डॉ. मिर्झा बेग एकात्मतेचे प्रतीक

## पद्मश्री शंकरबाबा पापडकर यांनी वाहिली श्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

प्रसिद्ध वर्हाडी विनोदी कवी डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांना अमरावती येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद आणि मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित या सभेत पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापडकर यांनी डॉ. बेग यांना हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हटले.




डॉ. पापडकर म्हणाले की, डॉ. मिर्झा बेग यांनी दुःखाने भरलेल्या जगात आनंद वाटला. त्यांची आणि माझी प्रत्यक्ष भेट झाली नाही, याचे मला दुःख आहे, असेही त्यांनी नमूद केले.

ही श्रद्धांजली सभा विमलाबाई देशमुख महाविद्यालयात पार पडली. याप्रसंगी साहित्यिक डॉ. सुभाष सावरकर, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, परफॉर्मिंग आर्टस विभागाचे प्रमुख भोजराज चौधरी, जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ आणि जिल्हाध्यक्ष डॉ. राज यावलीकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या सभेत प्रसिद्ध वर्हाडी कवी डॉ. राजा धर्माधिकारी, गौतम गुडधे, राजेश महल्ले, डॉ. राज यावलीकर, राजीव शिंदे, गझलकार खलिश अनंत नांदुरकर आणि नितीन भट यांनी आपल्या कविता सादर करून डॉ. मिर्झा यांना श्रद्धांजली वाहिली. डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, डॉ. शोभा रोकडे, प्राचार्य दिलीपसिंह खांबरे, रंजना मामर्डे, पुरुषोत्तमराव गावंडे, संजय महल्ले, वर्षा धाबे, प्रा. डॉ. राजेश मिरगे, सुनिता तायडे, शोभना देशमुख, सय्यद मुजीब, छाया पाथरे, अरविंद उतखेडे, गणेश खडके, असलम अहमद खान, चंद्रभूषण किल्लेदार, मोहम्मद अफसर, दिवाकर देशमुख, कल्पना विघे, योगिता पिंजरकर, शरद गावंडे, अश्विन चौधरी, मयूर देशमुख, प्रा. संजय खडसे, डॉ. कुमार बोबडे, माधव पांडे, रेषा अकोटकर आदींनीही श्रद्धांजली अर्पण केली.

विविध मान्यवरांनी डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या कवितेचे आणि त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू स्पष्ट केले. या कार्यक्रमासाठी लोककवी विठ्ठल वाघ आणि लोकनेते उल्हास दादा पवार यांनी शुभेच्छा पाठवल्या होत्या. श्रद्धांजली सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. सतीश तराळ यांनी केले, तर मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. मंदा नांदुरकर यांनी आभार मानले. या भावपूर्ण सभेला अमरावतीकर नागरिक, कवी आणि लेखकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महसूल मंत्र्यांच्या निर्णयाविरोधात अमरावतीत महसूल कर्मचारी आक्रमक

## सोमवारपासून सामूहिक रजा; बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील गौण खनिज प्रकरणात राज्य सरकारने ४ तहसीलदार, ४ मंडळ अधिकारी व २ ग्राम महसूल अधिकाऱ्यांना निलंबित केल्याच्या निर्णयाविरोधात अमरावती जिल्ह्यातील महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेली ही कारवाई अन्यायकारक असल्याचा आरोप करत अमरावतीतील महसूल विभाग आक्रमक झाला आहे.निलंबित अधिकाऱ्यांचा खुलासा न घेता व त्यांचे म्हणणे ऐकून न घेता थेट कारवाई करण्यात आल्याचा आरोप



महसूल कर्मचाऱ्यांनी केला आहे. या निषेधार्थ अमरावती जिल्ह्यातील सर्व महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निवेदन सादर केले. तसेच सोमवारपासून सामूहिक रजा घेत बेमुदत काम बंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.या कारवाईमुळे महसूल विभागातील तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, उपजिल्हाधिकारी यांच्यात प्रचंड नाराजी पसरली असून भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. भविष्यात कोणत्याही अधिकाऱ्यावर चौकशीअंती निष्पक्ष निर्णय न घेता थेट निलंबनाची कारवाई होऊ शकते, अशी चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, निलंबित अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील कारवाई तात्काळ रद्द करून त्यांना पूर्वपदावर पदस्थापना द्यावी, अशी मागणी महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या संघटनांनी महसूल मंत्र्यांकडे केली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.


# अपेक्षा, प्रश्न आणि शहराचे भवितव्य मतदार कोणाच्या हातात देणार सत्ता

## अमरावती महापालिका निवडणूक: निर्णायक लढती होणार, इच्छुकांची गर्दी वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

बहुप्रतीक्षेनंतर अखेर महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजले. साडेतीन वर्षांपासून रखडलेल्या या निवडणुकीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. प्रशासकीय राजवटीत सुरू असलेला कारभार आता पुन्हा लोकप्रतिनिधींच्या हाती जाणार असल्याने, ही निवडणूक केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता अमरावती शहराच्या पुढील पाच वर्षांच्या विकासाची दिशा ठरवणारी महत्त्वाची घटना ठरणार आहे.

अमरावती महापालिकेत एकूण २२ प्रभाग असून ८७ सदस्य सभागृहात निवडून जाणार आहेत प्रत्येक प्रभागातील नागरिकांना पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य सेवा, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक प्रकाश व्यवस्था यासारख्या मूलभूत नागरी




### आपला नगरसेवक कोण ?

महापालिका निवडणूक ही शहराच्या विकासासाठी दिशा ठरवणारी असते. त्यामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढताना दिसत आहे. 'आपला नगरसेवक कोण?' हा प्रश्न आता 'आपल्या प्रभागासाठी काम करणारा नगरसेवक हवा?' या अपेक्षेत रूपांतरित होत आहे. या निवडणुकीतून सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख महापालिका घडावी, अशी अपेक्षा शहरवासीय व्यक्त करत आहेत.

सुविधांचा प्रश्न भेडसावत आहे. मागील निवडणुकीत भाजपची सत्ता होती आणि महापौरपदही भाजपकडे होते. त्यानंतर सत्ताधारी खासदार नसल्याने अनेक प्रश्न निर्णयाअभावी रखडल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय कालावधीत काही विकासकामे झाली असली तरी त्याचा प्रत्यक्ष फायदा सर्व वॉर्डापर्यंत पोहोचला नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक भागांत रस्त्यांची दुरवस्था, अनियमित पाणीपुरवठा, कचरा उचलण्यात होणारा विलंब, पावसाळ्यात पाणी साचण्याचे प्रकार, तसेच आरोग्य सुविधा अपुऱ्या असल्याच्या तक्रारी कायम आहेत. त्यामुळे यावेळी नागरिकांचा रोख हा राजकीय घोषणांपेक्षा काम करणाऱ्या आणि जबाबदार नगरसेवकांकडे अधिक आहे. यावेळी कोण निवडणूक लढवणार, कोण जिंकणार किंवा कोण हरणार यापेक्षा कोण खऱ्या अर्थाने नागरिकांच्या प्रश्नांसाठी उभा राहणार याकडे मतदारांचे लक्ष आहे.

# कोणाला मिळणार तिकीट?कुणाची कटणार

## इच्छुकांनी उमेदवारीसाठी लावली फिल्डिंग; गाठीभेटी सुरू!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

महापालिकेची निवडणूक जाहीरझाल्यामुळे सर्वच पक्षांतील इच्छुकांनी उमेदवारीच्या तिकिटासाठी फिल्डिंग सुरू केली आहे. उमेदवारी मिळावी यासाठी नेतेमंडळींच्या भेटीगाठी सुरू झाल्या आहेत. तर ज्या ठिकाणी पॅनेल उभा करता येईल, त्यात समावेश कसा होईल, याचेही 'सेटिंग' सुरू झाले आहे.महापालिकेची निवडणूक साडेतीन वर्षांनंतर होत आहे. त्यामुळे ही निवडणूक माजी नगरसेवकांसह नवीन इच्छुकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. काहीही झाले तरी निवडणूक लढविण्याचाच चंग काही इच्छुकांनी बांधला आहे. त्यामुळे पक्षांकडे इच्छुकांची संख्या वाढली आहे. येत्या २३डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. प्रभागातील आरक्षण यापूर्वीच जाहीर झाले आहे. त्यामुळे प्रभागात कोणत्या संवर्गातील उमेदवार असणार, हे स्पष्ट झाल्याने या आरक्षणाप्रमाणे काही ठिकाणी माजी नगरसेवक



आणि इच्छुकांनी पत्नीला निवडणूक रिंगणात उतरविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पक्षांकडून तिकीट मिळाले नाही, तर इतर पक्षांतून तिकीट मिळविण्यासाठी हालचाली सुरू आहेत.

**इच्छुकांची वाढती संख्या; बंडखोरी वाढणार**

राजकीय पक्षांकडून अनेक प्रभागांमध्ये चारही नगरसेवक निवडून यावेत, यासाठी एक अनुभवी माजी नगरसेवक देऊन अन्य तीन ठिकाणी जातीय समीकरणानुसार नव्या चेहऱ्यांना कशी संधी देता येईल, याचे प्रयत्न सुरू आहेत. जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी उमेदवार देताना आवश्यक ती जुळवाजुळव सुरू झाली आहे. इच्छुकांची वाढती संख्या बघता बंडखोरीचे प्रमाण यंदा अधिक राहण्याची शक्यता आहे.

**भाजप-काँग्रेसकडून लढण्यास अनेकजण इच्छुक**

भाजप, काँग्रेसकडून लढण्यास अनेक माजी नगरसेवकांसह नव्याने तयारी केलेले काही इच्छुक लढण्यास तयार आहेत. यासाठी त्यांनी पक्षाकडे उमेदवारी अर्ज सादर केले आहे. काहींनी दोन्हीकडेही अर्ज भरल्याची माहिती मिळाली आहे. तर अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट, शिवसेनेचे दोन्ही गट, आप तसेच रिपाइंच्या गटांकडेही उमेदवारी मागितली आहे. त्यामुळे कोणाला कोणता पक्ष उमेदवारी देतो याकडे सध्या नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पोरगं चायनीज मांजा वापरणार पालकांवर गुन्हा दाखल होणार

## पालकांनो, मुलांकडे विशेष लक्ष द्या: पोलिसांची आहे करडी नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

मकरसंक्रांती सणाला अजून महिनाभर कालावधी बाकी असतानाच शहरात पतंगबाजीला उत्साहात सुरुवात झाली आहे. मात्र, कायद्याने पूर्णतः बंदी असलेल्या चायनीज व नायलॉन मांजाचा सर्रास वापर होत असल्याने अपघात व जीवितहानीचा धोका वाढला आहे. गेल्या वर्षी या धारदार मांजामुळे सात जण जखमी झाले होते.या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कडक इशारा दिला असून,



चायनीज किंवा नायलॉन मांजाचा वापर अथवा विक्री करताना आढळल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करून तुरुंगवासाची कारवाई केली जाईल. या मांजामुळे अपघात होऊन मृत्यू झाल्यास वापरकर्ते, विक्रेते तसेच पालकांवरही सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.शहरातील सर्व पोलिस ठाण्यांमार्फत सूचना जारी करण्यात आल्या असून, विशेष पथके नेमून बाजारपेठा व रस्त्यांवरील विक्रीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. पालकांनी आपल्या मुलांना चायनीज मांजा वापरू नये, अशा कडक सूचना द्याव्यात, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.चायनीज मांजा विक्रीबाबत तक्रार करण्यासाठी नागरिकांनी जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, १०० क्रमांकावर कॉल करावा किंवा पोलिस ॲपद्वारे तक्रार नोंदवावी, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# शासकीय रुग्णालयांतील बनावट औषधांना आळा

## राज्यात ८ अत्याधुनिक तपासणी यंत्रांची खरेदी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शासकीय रुग्णालयांमध्ये वाढत चाललेल्या बनावट व भेसळयुक्त औषधांच्या तक्रारींमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. काही ठिकाणी सरकारी पुरवठ्यातील औषधांमध्येही भेसळ आढळून आल्याने पारंपरिक प्रयोगशाळा तपासणीतील विलंबामुळे औषधे रुग्णांपर्यंत पोहोचत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने 'काउंटरफिट ड्रग्ज डिटेक्शन डिव्हाइस' ही अत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपकरणांच्या मदतीने औषधांची गुणवत्ता जागेवरच तपासता येणार असून काही मिनिटांत अचूक निकाल मिळणार आहेत. भेसळ आढळल्यास तातडीने कारवाई शक्य होईल. राज्यातील आठ उपसंचालक कार्यालयांना ही उपकरणे वितरित केली जाणार असून औषध वितरण केंद्रांवरील गुणवत्ता नियंत्रण अधिक ठोस होईल. रुग्णालयात औषधे पोहोचण्यापूर्वीच तपासणी पूर्ण होऊन वितरण प्रक्रिया अधिक सुरक्षित होणार आहे.

केवळ खासगी नव्हे तर काही सरकारी रुग्णालयांमध्येही बनावट औषधांचे प्रकार समोर आल्याने रुग्णांच्या आरोग्यावर गंभीर धोका निर्माण झाला होता. अलीकडील तपासणीत शेकडो औषधांचे नमुने बनावट आढळले आहेत. ही समस्या लक्षात घेऊन सरकारने त्वरित उपाययोजना केल्या आहेत.

प्रत्येक मशीनची किंमत सुमारे १.१९ कोटी रुपये असून अशा एकूण आठ यंत्रांची खरेदी करण्यात येणार आहे. या उपकरणांमुळे औषध तपासणी जलद, अचूक व प्रभावी होऊन भेसळयुक्त औषधांवर नियंत्रण मिळवणे सुलभ होईल.

# असंघटीत कामगारांच्या विकासासाठी योजना राबवाव्यात- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

कामगार विभागातर्फे असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी कार्य करण्यात येत आहे. येत्या काळात कामगार आणि त्यांच्या कुटुंबांसाठी विकासाच्या योजना राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात असंघटीत कामगार, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, बाल कामगार कृतीदल समिती व बालकामगार सल्लागार समन्वय समिती, वेठिबगार दक्षता समिती, माथाडी व असंघटीत कामगार यांच्याबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, सहायक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे, सरकारी कामगार अधिकारी श्रीकांत झंवर, कुलदिन भोलाने



आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, असंघटीत क्षेत्रात काम करणारा वर्ग हा कमी उत्पन्न असलेला घटक आहे. त्यामुळे त्याला सामाजिक सुरक्षा जास्त प्रमाणात देण्यात यावी. त्यांच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने घरासंदर्भात योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. कामगारांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांमध्ये प्रामुख्याने निवृत्तीनंतर किंवा काम सोडल्यानंतर लाभ द्यावयाचे आहेत. मात्र कामगारांचे कौशल्य विकसित करण्यावरही भर देण्यात यावा. कामगारांची आयुष्मान भारत योजनेत नोंदणी करावी, त्यामुळे त्यांना पाच लाख रूपयांचा प्रत्येक वर्षी आरोग्याचा लाभ मिळू शकेल. बाल व किशोरवयीन कामगार हे प्रामुख्याने विटभट्टीवर आढळून येतात. आतापर्यंत यात २८ जणांबाबत कारवाई करण्यात आली आहे. मेळघाटातील कामगार हे प्रामुख्याने अकोला जिल्ह्यात स्थलांतरीत होतात. त्यामुळे अमरावती आणि अकोला जिल्ह्यांनी संयुक्तपणे कारवाई करावी. कारवाईपश्चात गुन्हा दाखल झाल्यानंतरही या प्रकरणाचा कामगार विभागाने पाठपुरावा करावी. जिल्ह्यात छोटे टेक्सटाईल उद्योगामध्येही बालकामगार असण्याची शक्यता आहे. याठिकाणीही पडताळणी करण्यात यावी, असेही निर्देश श्री. येरेकर यांनी दिले.

# दोन कार, एक दुचाकीचा भीषण अपघात

## वाठोडा खुर्द गावा नजीक घडली घटना : एक ठार सहा गंभीर जखमी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा**

कुऱ्हा ते तिवसा मार्गावर असलेल्या वाठोडा खुर्द गावा नजीक ता. १६रोजी रात्री दहा वाजता दरम्यान दोन कारसह एका दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली यात एकजण जागीच ठार असून पाचजण जखमी असल्याची माहिती पुढे येत आहे.अनिल शेषराव खारकर वय ६६ रा. वाठोडा खुर्द असे अपघातातील मृतकाचे नाव असून दुचाकीवरील अजय बबन चव्हाण वय ३०,रोशन श्रीधर चव्हाण वय २९,शुभम विजय इंगोले वय ३०,सर्व रा. घोटा, नेनो कारचालक चंद्रशेखर मनोहर ठाकूर वय ५४रा. सातरगाव, तसेच स्कोडा कारचालक दीपक सुभाष पडोळे वय ३६ रा. कुऱ्हा, निलेश केशवराव लोंदे वय ४२रा. वाठोडा खुर्द अशी सहा जखमीची नावे आहे.

प्राप्त माहिती नुसार घोटा येथील तीन मित्र हे एमएच २७बीए १०५६क्रमांकाच्या युनिकोन दुचाकीने गावी जातं होते, याच दरम्यान कुऱ्हावरून येणाऱ्या एमएच २७एआर ३५०२ क्रमांकाच्या नेनो कार व दुचाकीची समोरासमोर धडक झाली.ज्यात घोटा येथील तीनही मित्र गंभीररित्या जखमी झाले. यावेळी मदतीसाठी वाठोडा खुर्द येथील युवक काँग्रेसचे लुकेश केने हे घटनास्थळी दाखल झाले इतक्यात तिवसावरून येणाऱ्या एमएच ३४एएम ५४७७क्रमांकाच्या भरधाव स्कोडाने केने यांच्या स्विफ्ट डिझायर या कारला जबर धडक दिली.ज्यात अनिल खारकर व निलेश लोंदे हे गंभीर जखमी झाले. श्री.खारकर यांचा घटनास्थळी मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीसांनीं धाव घेत सर्व जखमीनां तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. जखमींची प्रकृती पाहता डॉक्टरांनीं सर्व जखमीनां पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा रुग्णालय पाठविले. मृतक अनिल खारकर यांच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून दोन्ही कार चालका विरुद्ध गून्हा दाखल करण्यात असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# शेतात गांजाची लागवड; चार लाखांचा गांजा जप्त : मिशन परिवर्तन अंतर्गत कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७बुलढाणा**

देऊळगाव राजा तालुक्यातील मेव्हणा राजा शिवारात शेतामध्ये अवैधरित्या गांजाची लागवड करून त्याची साठवणूक करणाऱ्या एका इसमास बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. या कारवाईत ३ लाख ८५ हजार १०० रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या संकल्पनेतून जिल्हाभरात अंमली पदार्थांविरोधात राबविण्यात येत असलेल्या मिशन परिवर्तन



अंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

गांजा व इतर अंमली पदार्थांची लागवड, वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, विष्णु सुखदेव बोरुडे (वय ३९, रा. मेव्हणा राजा) याने आपल्या शेतामध्ये तुरीच्या पिकात गांजाची लागवड केली आहे.

माहितीच्या आधारे पथकाने पंचासमक्ष शेतात छापा टाकला असता गांजाची लागवड व साठवणूक आढळून आली. कारवाईदरम्यान आरोपीकडून ओलसर गांजाची झाडे २८ किलो ५१ ग्रॅम २ लाख ८५ हजार, सुकलेला गांजा ४ किलो ७०० ग्रॅम किंमत ९४ हजार असा एकूण ३ लाख ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध देऊळगाव राजा पोलीस ठाणे येथे अंमली औषधीद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम कलम २० (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास देऊळगाव राजा पोलीस करीत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा (खामगाव) व अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.कारवाईत सपोनि यशोदा कणसे, सफौ. राजकुमार राजपूत, हवालदार गजानन दराडे, दिनेश बकाले, अनुपकुमार मेहेर, दिगंबर कपाटे, सतीश मुळे, वनिता शिंगणे, नायक युवराज राठोड, जमादार मंगेश सनगाळे, मनोज खरडे, समाधान टेकाळे, राहूल बोर्डे, विलास भोसले यांनी केली.

# श्रीरामचंद्र संस्थानकडून अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या इंधनाची मोफत व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदगाव पेठ**

येथील अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक श्रीरामचंद्र संस्थानने समाजहिताचा एक महत्त्वपूर्ण आणि मानवतावादी उपक्रम सुरू केला आहे. अंत्यसंस्काराच्या दुःखद प्रसंगी लागणाऱ्या इंधनासह आवश्यक साहित्याची व्यवस्था संस्थानच्या वतीने करण्यात येत असून, त्यामुळे शोकाकुल कुटुंबीयांना मोठा आधार मिळत आहे. वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय तसेच संतश्री गुलाबराव महाराज यांच्या उपासनेचे केंद्र असलेले श्रीरामचंद्र संस्थान हे धार्मिकतेबरोबरच सामाजिक कार्यासाठीही परिचित आहे. आजवर अनेक साधू, संत, सत्पुरुष तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी या संस्थानला भेट दिली असून, संस्थानच्या माध्यमातून निरंतर सत्संग, अन्नदान व विविध समाजोपयोगी व राष्ट्रसेवेची कार्ये सुरू आहेत.वर्तमान काळात नांदगावपेठ व परिसरातील पंचक्रोशीमध्ये दुर्दैवाने मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी लागणारे इंधन व अन्य साहित्य मिळवताना कुटुंबीयांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन, मृत्यूसारख्या दुःखद प्रसंगी शोकाकुल कुटुंबीयांना अधिक अडचणींना सामोरे जावे लागू नये, या सेवाभावी उद्देशाने श्रीरामचंद्र संस्थानने लाकूड, इंधन, गोवरी, तुऱ्हाटी आदी साहित्याची व्यवस्था संस्थानच्या वतीने उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाचा आतापर्यंत अनेक कुटुंबीयांनी लाभ घेतला असून, संस्थानच्या या सेवेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे भविष्यात अशा दुःखद प्रसंगी संबंधित कुटुंबीयांनी संस्थानशी संपर्क साधून या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.संस्थानच्या या सेवाभावी कार्याबद्दल ग्रामस्थांकडून कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे. गावातील कोणत्याही व्यक्तीला मृत्यूसारख्या दुःखद प्रसंगी अधिक त्रास होऊ नये, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे संस्थानने स्पष्ट केले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत